
# द लिट्ल प्रिन्स

लेखक व चित्रकार

आन्तुआन द संतेक्झ्युपेरी

मराठी अनुवाद

लतिका मांडे



हे पुस्तक एका मोठ्या माणसाला अर्पण केल्याबद्दल मी हे पुस्तक वाचणाऱ्या मुलांची क्षमा मागणार आहे.

पण मी असं करण्याला काही महत्वाची कारणं आहेत.

एक म्हणजे, अख्ख्या जगातला हा माझा सर्वात जवळचा मित्र आहे.

दुसरं म्हणजे, या मोठ्या माणसाला सगळं काही समजू शकतं – म्हणजे अगदी लहान मुलांची पुस्तकंदेखील त्याला समजतात.

शिवाय आणखी तिसरं एक कारण आहे. तो फ्रान्समधे राहतो ना, तिथे तो भुकेलेला आहे, गारठून गेला आहे. त्याला प्रोत्साहनाची गरज आहे. आणि त्यातूनही ही तिन्ही कारणं तुम्हाला पुरेशी वाटत नसतील तर मी हे पुस्तक त्या छोट्या मुलालाच अर्पण करतो, ज्याच्यामधून हा मोठा माणूस वाढला. तशी सगळीच मोठी माणसं कधीतरी छोटी मुलं असतातच, जरी त्यांच्यापैकी फारच थोडयांना हे आठवत असतं.

तेव्हा मग मी माझी अर्पणरेखा जराशी सुधारतो आणि म्हणतो –

– लेओ वेर्थ यास


जेव्हा तो एक छोटा मुलगा होता



एकदा म्हणजे मी सहा वर्षांचा असताना, 'अरण्यातील सत्यकथा' नावाच्या पुस्तकात एक बेफाटच चित्र पाहिलं. या पुस्तकात फार प्राचीन अरण्यांबद्दलची माहिती होती आणि त्यात एक अजगर अख्खाच्या अख्खा प्राणी गिळत असलेला दाखवला होता. ही त्याच चित्राची प्रतिकृती.

आणखी त्या पुस्तकात असं म्हटलं होतं की, 'बोआ अजगर, आपलं भक्ष, अजिबात तुकडे वगैरे न करता, संपूर्णच्या संपूर्ण, जिवंत असतानाच गिळून टाकतात. त्यानंतर त्यांना इतकी सुस्ती येते की जागचं हलणंदेखील अशक्य होऊन जातं. मग ते तब्बल सहा महिने झोपूनच काढतात, गिळलेलं भक्ष नीच पचण्यासाठी एवढा वेळ लागतोच.


त्यानंतर जंगलातल्या साहसांबद्दल मी खूपच विचार करायला लागलो. रंगीत पेन्सिली घेऊन काहीतरी रेखाटण्याचा प्रयत्न करू लागलो; आणि एक दिवस चक्क मी माझं पहिलं चित्र पूर्णसुद्धा केलं. ते माझं पहिलं चित्र असं दिसत होतं.



ही माझी उत्कृष्ट चित्रकृती मी वडिलधाऱ्या मंडळींना दाखवली आणि त्यांना विचारलं की चित्र पाहून तुम्हाला भीतीबिती वाटतीय का म्हणून. तर त्यावर त्यांनी काय म्हणावं...?

ही मंडळी मला म्हणाली, "भीती? हॅटला पाहून कुणी कशाला घाबरेल बुवा?"

माझं चित्र म्हणजे काही हॅटचं चित्र नव्हतं. ते होतं एका हत्ती गिळलेल्या अजगराचं चित्र. पण आता या मोठ्या माणसांना ते समजू शकत नाहीये. असं पाहिल्यावर मग, मी दुसरं चित्र काढलं. त्यात मी बोआच्या पोटाचा आतला भाग दाखवला, म्हणजे आता या मोठ्या माणसांना तो नीट बघता येईल. त्यांना म्हणजे नेहमी अगदी सगळ्या गोष्टी समजावून सांगायला लागतात ना! तर ते दुसरं चित्र असं होतं.



यावेळचं चित्र पाहून त्यांनी काय म्हणावं? त्यांनी मला सरळ सल्ला दिला की मी माझी अजगराची चित्र बाजूला ठेवावीत, मग ती आतून काढलेली असोत, नाही तर बाहेरून. आणि मी आता माझा वेळ गणित, व्याकरण, इतिहास, भूगोल यांच्या कारणी लावावा. तर थोर चित्रकार होण्यांचा माझा प्रयत्न मला यासाठी सोडून द्यावा लागला. ! तर तुम्हाला दाखवलेल्या या दोन्ही चित्रांचा अपयशानं मी अगदी निराश होऊन गेलो. या मोठ्या माणसांना म्हणजे स्वतःचं स्वतःला तर काही कळत नाहीच, आणि त्यांना सतत प्रत्येक गोष्ट समजाऊन सांगायची म्हणजे आपल्याला ते किती कटकटीचं काम होऊन बसतं.

पुढे मग मी दुसरा व्यवसाय निवडला आणि विमान चालवायला शिकलो. अख्ख्या जगावरून मी थोडंफार उडन होतो. त्यावेळी मात्रा मला भूगोलाच्या ज्ञानाचा खरंच उपयोग झाला. एका दृष्टिक्षेपात मला चीन आणि ॲरिझोनामधील फरक कळू लागला. तुम्ही जर रात्री दिशा चुकलात ना, तर ही भूगोलातली माहिती तुमच्या फार उपयोगी पडते.

पुढे माझा अनेक मोठ्या माणसांशी वेगवेगळ्या निमित्तानी संबंध आला मी त्यांच्याबरोबर राहिलो, त्यांचा जवळून पाहिलं. पण त्यांच्याबद्दलचं माझं मत कधीच फारसं सुधारलं नाही.

कधी एखादा माणूस जरा हुशार दिसतोय असं मला वाटलं की मी त्याला ते माझं पहिलं चित्र दाखवायचो. अजूनही मी ते जपून ठेवलं आहे. त्या माणसाला खरोखरच काही समजतंय का याची मी परीक्षा घ्यायचो. पण तो बहुधा असंच म्हणाचया की ही एक हॅट आहे म्हणून. मग काही मी त्याच्याशी बोआ अजगराबद्दल, त्या घनदाट जंगलाबद्दल की आकाशातील ताऱ्यांबद्दल कशाकशाबद्दलच बोलायचो नाही. त्याला माहित असलेल्याच ब्रिज, गोल्फ, राजकारण, टाय असल्या काहीतरी विषयांवर आम्ही बोलत रहायचो आणि आपल्याला एक मोठा शहाणा समंजस माणूस भेटला बुवा म्हणून त्यालाही आंनद वाटायचा.

## 2

तेव्हा मी आपला तसा एकटाच असायचो पुष्कळदा. कुणीच नसायचं माझ्याशी बोलायला. सहा वर्षापूर्वी सहाराच्या वाळवंटात माझ्या विमानाला अपघात झाला ना, तोपर्यन्त हे असंच चाललं होतं. माझा विमानाच्या इंजिनात काहीतरी बिघाड झाला होता.

त्या दिवशी माझा इंजिनचं काहीतरी बिघडलं होतं. माझ्याबरोबर ना कुणी मेकॅनिक होता, ना कुणी प्रवासी. विमानदुरुस्तीचं अवघड काम एकट्यानंच करायच्या प्रयत्नात मी होतो. माझ्या दृष्टिनं तो माझ्यावर ओढवलेला जीवनमरणाचा प्रश्न होता, कारण माझ्याजवळ आता जेवढं पाणी उरलं होतं ते फार-फार तर आठवडाभरच जेमतेम पुरलं असतं.

रात्र झाली. माणसांची वस्ती हजारो मैल दूर. त्या प्रचंड अफाट वाळवंटात मी तसाच झोपून गेलो. भर समुद्रात जहाज फुटल्यामुळे एखाद्या तराफ्यावर तरंगत रहणाऱ्या खलाशासारखा मी एकाकी होतो. आणि अशा अवस्थेत भल्या पहाटे, एका गंमतीदार आवाजानं जेव्हा मला जागं केलं, तेव्हा मला किती म्हणजे किती आश्चर्य वाटलं असेल ह्याची तुम्ही नुसती कल्पनाच करा!


कुणीतरी मला म्हणत होतंः

“प्लीज... मला मेंढीचं चित्र काढून दे ना!”

“आं...?”

“मला मेंढीचं चित्र काढून दे ना एक.” तोच आवाज पुन्हा आला.

अंगावर वीज पडावी असा मी ताडकन् उठलो. डोळे खूप चोळले आणि पहातच राहिलो. एक अतिविलक्षण, छोटीशी बटू मूर्ति माझ्याकडे मोठ्या गंभीरपणे निरखून पहात होती. पुढे पुष्कळ दिवसांनतर, माझ्यापरीनं खूप प्रयत्नपूर्वक तिचं चित्र मी काढलं. ते चित्र मी तुम्हाला दाखवतोच. अर्थातच, माझं हे चित्र प्रत्यक्ष त्या मूर्तीपेक्षा खूपच कमी लोभस आहे. पण त्याच माझा काही दोष नाहीय बरं का. कारण मी तुम्हाला सांगितलंच आहे की वयाच्या सहाव्या वर्षीच तर ह्या मोठ्या माणसांनी मला चित्रकार बनण्यापासून परावृत्त केलं होतं. आणि शिवाय त्या वेळेसही मला फक्त बोआ अजगराचीच चित्रं काढता येत होती, एक बाहेरून दिसणारा बोआ अजगर आणि एक आतल्या बाजूनं दिसणारा बोआ अजगर. तर अशा आकस्मिक रीतीनं प्रकटलेल्या त्या आकृतीकडे मी आश्चर्यानं, मोठ्ठाले डोळे करून पहातच राहिलो. लक्षात घ्या, मी मनुष्यवस्तीपासून हजारो मैल दूर. ही वल्ली ना वाट चुकलेली दिसत होती, ना तहानेनं की भुकेनं व्याकूल झालेली. ना थकूनभागून शिणलेली, ना भीतीनं घाबरलेली. वस्तीपासून दूर असलेल्या, एखाद्या वाळवंटात हरवेलेल्या लहान मुलासारखा तो मुळीच दिसत नव्हता. शेवटी बोलण्याएवढी शुद्ध आल्यावर मी त्या बालमूर्तीला



म्हटलं.

“पण तू इथं काय करता आहेस?”

त्यानं पुन्हा एकदा, अगदी सावकाशपणे, एखादी महत्वाची गो�ट सांगावी तसं मला म्हटलं :

“प्लीज ... मला ... मेंढीचं... चित्रा... काढून... दे.”

आपण जेव्हा एखाद्या गूढ घटनेनं भारावून जातो ना, तेव्हा आपल्याला नाही म्हणायचापण धीर होत नाही. मनुष्यवस्तीपासून हजारो मैल दूर, मृत्यूच्या कल्पनेनं चिंताग्रस्त झालेल्या मला हे सगळं चमत्कारिक भासत असूनही मी सरळ खिशातून पेन आणि कागद काढला. तेवढयात मला आठवलं की मी तर फक्त इतिहास, भूगोल, गणित आणि व्याकरणच शिकलो आहे. तेव्हा थोडंसं वैतागूनच मी त्याला म्हटलं की मला चित्रं काढता येत नाहीत. तर तो म्हणाला :

“काही हरकत नाही. चित्रं येत नसली तरी तू आत्ता मला एक मेंढीचं चित्र काढून देच.”

मी ह्यापूर्वी मेंढीचं चित्र कधीच काढलेलं नव्हतं म्हणून मी नेहमी काढायचो त्या दोहोतलं एक आपलं ते त्या बोआ अजगराचं बाहेरचं चित्र काढलं आणि त्याला दाखवलं. त्यावरचं त्याचं मत ऐकून मी थक्कच होऊन गेलो. तो म्हणाला :

“नको रे बाबा ! मुळीच नको मला हे चित्र. मला बोआ अजगराच्या पोटातला हत्ती मुळीच नकोय. बोआ अजगर महाभयंकर असतो आणि मी राहतो तिथे सारं कसं अगदी छोटस्सं आहे. मला फक्त मेंढीच हवीय. मला मेंढी काढून दे.”




मग मी एक चित्र काढलं.

त्यानं ते बरंच निरखून पाहिलं आणि म्हटलं :

“नको, ही नको. ही तर आत्ताच मरतुकडी दिसतेय. दुसरी काढ.”

मग मी दुसरी काढली.

आता समजुतीचा आव आणीत माझा छोटा मित्र हसून म्हणाला :



"बघ, ही मेंढी नाहीय हे स्पष्ट दिसतंय. हा मेंढा आहे, कारण त्याला शिंगं आहेत...."

म्हणून मग मी पुन्हा दुसरं बिनशिंगाचं चित्र काढलं.



ते स्वीकारायलाही त्यानं पहिल्यासारखाच नकार दिला.

"ही तर फारच म्हातारी आहे. खूप दिवस जगेल अशीच मेंढी मला हवीय."

इतकं होईपर्यन्त माझा धीर संपला होता. मला माझं विमान दुरुस्त करणची घाईही होती. म्हणून मग कसंतरी, घाईघाईनं मी खाली दाखवलेलं चित्रा रेखाटलं आणि ते त्याला देत म्हटलं :

"ही एक बंद पेटी आहे, आणि तुझी मेंढी ह्या पेटीत आहे."



आता मात्र माझ्या या छोट्या परीक्षाकाचा चेहरा आनंदां उजळला आणि ते पाहून मला आश्चर्य वाटलं.

"आत्ता कसं ! मला अगदी अस्संच चित्र हवं होतं." तो म्हणाला.

"ह्या मेंढीला गवत खूप लागेल का रे?" त्यानं पुन्हा विचारलं.

"का?"

"कारण मी रहातो तिथे सगळं कसं अगदी छोटंसं-छोटंसे आहे."

"अरे तिथं मिळेल तेवढं गवत नक्की पुरेल हिला. मी तुला अगदी छोटीशी मेंढी दिलीय."

तो माझ्या चित्रावर ओणवला आणि ते पहात म्हणाला :

"एवढी काही लहान नाहीय... झोपलीय बघ कशी."

तर अशी माझी त्या छोट्याशा राजकुमाराशी ओळख झाली.

# 3

तो कुठून आला होता हे समजायला तर मला फारच वेळ लागला. हा छोटा राजकुमार स्वतः खूप प्रश्न विचारायचा. पण माझे प्रश्न तोही ऐकतोय आणि उत्तर देतोय असं मात्रा कधी दिसलं नाही. सहज म्हणून तो जे काय थोडंफार बोलत गेला त्यावरून मग मला हळूहळू सगळं उमजत गेलं.

पहिल्यांदाच त्यानं माझं विमान पाहिलं ना, (मी काही आत्ता विमानाचं चित्रबित्र काढत नाहीये बरं का, ते काढणं म्हणजे फारच किचकट असणार!) तेव्हा त्यानं मला विचारलं :

“ती काय वस्तू आहे बरं?”

“ही काही अशीतशी वस्तू नाही, ते विमान आहे विमान, ते उडू शकतं. माझं आहे ते विमान!”

मी उडू शकतो हे त्याला सांगताना मला अगदी ऐट वाटत होती.

त्यावर तो ओरडलाच जवळजवळ :

“म्हणजे काय? तू काय आकाशतून खाली पडला आहेस?”

“हो ना.” मी नम्रपणे म्हटलं.

“वाः! मग ही तर फारच मजेची गोष्ट आहे.”

असं म्हणून तो छोटासा राजकुमार इतकं गोडगोड, छानछान हसत सुटला. त्यामुळे मला मात्र जरा रागच आला. कारण मला बुवा असं वाटतं की माझ्यावर ओढवलेल्या आपत्तींची दखल इतरांनी गंभीरपणे घ्यायला हवी.

“अच्छा! म्हणजे तूही आकाशातूनच आला आहेस तर! तुझा ग्रह कोणता रे?”

आणि त्याच क्षणी तो असर इथं आपल्या पृथ्वीवर असण्यामधलं विलक्षण गूढ उमजू शकेल असा आशाकिरण मला जाणवला आणि मी त्याला धाड्कन विचारलं :

“तू... तू वेगळ्या ग्रहावरून आला आहेस?”

पण त्यानं तोंडानं काहीच उत्तर दिलं नाही? फक्त होकारार्थी मान हलवली आणि त्यावेळीही त्याची नजर माझ्या विमानाकडेच होती.

“बाकी या वाहनातून आलाहेस म्हणजे तू काही फार लांबून येणं शक्य नाही.”

नंरत बराच वेळ तो आपल्या स्वतःच्या दुनियेत हरवून गेला... त्यानंतर त्यानं खिशातून माझी मेंढी काढली आणि आता त्या अनमोल खजिन्याच्या चिंतनात स्वतःला बुडवून घेतलं.

त्यानं केलेल्या त्या ‘दुसऱ्या ग्रहा’ च्या अर्धवट उल्लेखामुळे माझं कुतूहल किती प्रचंड वाढलं असेल की नाही? त्यामुले त्याबद्दल आणखी माहिती करून घेण्यासाठी मी जोरदार प्रयत्न केला. मी त्याला विचारलं :

“गडया, तू कुठून येतो आहेस? तुझं हे ‘मी रहातो तिथे’ ते कुठे आहे? ही तेरी मेंढी तुला कुठे न्यानची आहे?”

काही वेळ तो नुसताच विचार करीत राहिला. जराशानं म्हणाला :

“तुझ्या ह्या पेटीची चांगली गोष्ट म्हणजे माझ्या मेंढीला रात्री तिचं चांगलं घरच होईल.”

“ते तर खरंच. आणि तू जर शहाण्यासारखा वागलास ना, तर दिवसा मेंढी बांधून ठेवायला मी तुला एक दोर आणि एक खुंटा पण देईन.” मी त्याला म्हटलं.

पण ह्या सूचनेनं त्याला धक्काच बसलासं दिसलं.

“बांधून ठेवयाचं? शीः! भलतंच काही तरी!”

“अरे पण तू जर तिला बांधून ठेवलं नाहीस तर ती दिवसा कुठेही जाईल. हरवेलसुद्धा...”

ह्यावर माझ्या मित्राला पुन्हा खूप हसू फुटलं.

“पण ती जाऊनजाऊन कुठे जाईलसं तुला वाटतं?”

“कुठेही... नाकासमोर, सरळ पुढे...”

मग तो गंभीरपणांने म्हणाला :

“त्याची काही गरज नाही. मी राहतो तिथे सगळं काही इतकं छोटंसं आहे!”

मग किंचित उदासपणे तो पुढे म्हणाला :

“स्वतःच्या नाकासमोर... अगदी सरळ, पुढे, कुणीही फार लांब जाऊ शकत नाही.”


## 4


आणि अशा रीतीनं मला त्याच्या ग्रहबद्दलं महत्वाचं दुसरं सत्य कळून आलं की, ज्या ग्रहावरुन आला होता, तो ग्रह जेमतेम एखाद्या घरोपेक्षाच शकत नाही.”

मला काही त्याबद्दल फारसं आश्चर्य वाटलं नाही, कारण मला हे चांगलं माहितच होतं की आपण ज्यांना पृथ्वी, गुरु, मंगल, शुक्र अशी नावं दिलेली आहेत, अशा मोठ्या ग्रहांबरोबरच अंतराळात आणखी अतर शेकडो ग्रह असतात, आणि ते इतके लहान असतात की आपण चांगल्या दुर्बिणींनी पाहिलं तरी ते आपल्याला मोठ्या मुश्किलीनंच दिसतात, जेव्हा एखादा शास्त्रज्ञ त्यातला एखादा ग्रह शोधून काढतो, तेव्हा तो काही त्याला नावबिव देत नाही. तो फक्त त्या नव्या ग्रहाला एक नंबर देतो. उदाहरणार्थ : लघुग्रह 325.

हा छोटा राजकुमार ज्या ग्रहावरुन आलेला होता तो लघुग्रह म्हणजे ब–612 असावा असं वाटायला माझ्याजवल सबळ कारण आहे. हा लघुग्रह दुर्बिणीतून फक्त एकदाच दिसला होता. एका तुर्की शास्त्रज्ञानं 1909 मधे तो त्याच्या दुर्बिणीतून पाहिला होता.

आपल्या शोधाची माहिती मोठ्या उत्साहानं त्यानं एका आंतरराष्ट्रीय परिषदेत सादर केली. पण त्यावेळेस तो त्याच्या तुर्की पोशाखात होता आणि केवल त्यामुळे कुणीही त्याच्या या मौलिक माहितीवर विश्वास ठेवला नाही. असलीच असतात ही मोठी माणसं...!





सुदैवानं, पुढे ब–612 या लघुग्रहाच्या लौकिकासाठी, एका तुर्की हुकुमशहानं आपल्या प्रजेला तुर्की पोशाखाऐवजी पाश्चात्य पोशाख घालण्याची मुळी सक्तीच केली. या कायदा न पाळणारांसाठी मृत्युदंड ठेवला होता! तेव्हा 1920 मधे त्याच शास्त्रज्ञानं युरोपियन पोशाख धारण करून मोठ्या प्रभावीपणे आणि ऐटीत आपलं प्रात्यक्षिक सादर केलं आणि मग, या वेळेला, त्याच्या या संशोधनाला प्रत्येकानं मान्यता दिली. तुम्हाला विश्वासात घेऊन त्या ग्रहाचा नंबरही सांगितला, ह्याचं कारण . . . ही मोठी माणसं! ह्या मोठ्या माणसांना आकडे फार आवडतात. तुम्ही जर कधी त्यांना सांगितलं ना, की तुम्हाला एक नवा मित्र मिळालाय, तर त्याच्याबद्दल ते तुम्हाला कधीही खऱ्या महत्वाच्या गोष्टी विचारणार नाहीत . . . म्हणजे की बुवा त्याचा आवाज कसा आहे? . . . त्याला कोणते खेळ आवडतात? तो फूलपाखरं गोळा करतो की नाही? त्याउलट ते तुम्हाला विचारतील : “त्याचं वय किती? त्याला भाऊ किती? त्याच्या वडलांना पगार किती?” आणि त्या आकडयांवरून मग त्यांना पटेल की मिळाली बुवा आपल्याला अगदी खरीखरी माहिती. जर समजा तुम्ही ह्या मोठ्या माणसांना सांगितलंत की ‘मी एक छानसं घर पाहिलंय, गुलाबी विटांच . . .! आणि त्याच्या खिडक्यांमधे जिरॅनियमची फुलं होती . . . आणि शिवाय त्याच्या छपरावर तर कबुतरं बसलेली होती. . . ! – तर यावरून त्यांना या घराबद्दल काहीही समजणार नाही. त्यांना तुम्हाला असंच सांगायला लागतं की ‘मी नं, एक लाख रुपये किंमतीचं घर पाहिलंय’ तर मग ते म्हणणार, ‘अरे वा! किती बरं सुंदर घर असेल ते!!’

तसंच, जर का तुम्ही त्यांना सांगितलंत की बुवा “एक खरोखरीचा इटुकलासा राजपुत्र अस्तित्वात होता आणि त्याबद्दल पुरावा असू शकतो.” – तर ते त्यांना कधीही पटणार नाही. हे सगळं ऐकल्यावर ते फक्त खांदे उडवतील आणि तुम्हाला दाखवून देतील की तुम्ही म्हणजे फक्त एक फारशी अक्कल नसलेलं लहान पोर आहात. पण जर का तुम्ही त्यांना असे सांगितलंत की ‘ब–612’ या लघुग्रहवरून तो राजपुत्र इथे आला होता.’ तर मग ते फारशा चौकशा करीत बसणार नाहीत.

तर ही मोठी माणसं म्हणजे अशीच असणार आणि त्याबद्दल त्यांचावर रागावण्यातही काही अर्थ नसतो. लहानांनी नेहमीच वडीलधाऱ्या मंडळींकडे कानाडोळा करावा, दुर्लक्ष करावं, हेच योग्य होय. पण हे तर खरंच की, आपल्याला खरं जीवन म्हणजे काय हे समजतं, आकडे हे काही आपल्या लेखी मतभेदाचा मुद्दा असू शकत नाहीत. म्हणूनच आपण आकडयांना तसं महत्व देत नाही. ह्या माझ्या गोष्टीची सुरुवातही एखाद्या परीकथेप्रमाणे करायला मला आवडलं असतं. मग मी म्हटलं असतं :

“कोणे एके काळी, एक इटुकलासा राजकुमार, त्याच्यासारख्याच एका इवल्याशा ग्रहावर रहात असे. त्याला एक मित्र हवा होता . . .”

ज्यांना जीवन म्हणजे काय हे समजतं, अशांना मग ती गोष्ट कितीतरी जास्त खरी वाटली असती.

. . . या साऱ्या आठवणी पुन्हा स्मरताना मला अतोनात दुःख होतंय. माझा मित्र त्याच्या

मेंढीसह माझ्यापासून निघून गेला या घटनेला आता सहा वर्षं उलटून गेली आहेत. त्याच्याबद्दल मी हे सारं सांगतो आहे ते कशासाठी.. तर त्याला मी कध्धी विसरणार नाही याची खात्री करून घेण्यासाठी. मित्राला विसरून जाणं म्हणजे किती दुःखदायक. जगात प्रत्येकाला मित्र मिळतोच असं नाही आणि मी जर या मित्राला विसरलो तर मीसुद्धा फक्त आकडयांवरच प्रेम करणाऱ्या त्या मोठ्या माणसांसारखाच होऊन जाईन, नाही का? म्हणूनच, मी एक रंगपेटी आणि काही रंगीत पेन्सिली विकत घेतल्या आहेत. आता ह्या वयात, चित्र काढायला पुन्हा सुरुवात करणं मोठं कठीण आहे, विशेषतः ज्यांनी आपल्या वयाच्या सहाव्या वर्षीच, फक्त बोआ अजगराची, आतली व बाहेरचीच, चित्रं काढली आहेत, त्याच्यासाठी! अर्थातच, माझ्यापरीनं मी त्याच्याशी मिळतंजुळत चित्र काढण्याचा शक्य तेवढा सगळा प्रयत्न करीन. पण त्यात यश येईलच ह्याची खात्री मला वाटत नाही. एखादं चित्र जरासं जुळतं तर दुसरं मुळीच जुळत नाही. मी काढलेली छोट्या राजकुमारची उंची पण चुकते. कधीतरी तो खूप मोठा होतो, तर कधी खूप लहान. त्याच्या पोशाखाचे रंग रंगवतानाही मी घोटाळतो, धडपडतो. थोडं इकडे.. थोडं तिकडे.. काहीतरी रंगवतो झालं.

## 5

एकएक दिवस उलटत होता आणि आमच्या गप्पांमधून राजपुत्राच्या ग्रहाबद्दल, त्यानं तिथून केलेल्या प्रयाणाबद्दल, त्याच्या प्रवासाबद्दल मला रोज काही ना काही कळतच असे. मात्र ही सगळी माहिती अगदी हळूहळू मिळत होती, म्हणजे सहज बोलता बोलता त्याच्या विचारांमधून काहीतरी कळून जायचं, आणि असंच बोलता बोलता तिसऱ्या दिवशी मला त्या बाओबाबच्या संकटाबद्दल कळलं.

ह्या वेळीपण, ती मेंढीच त्याला कारण झाली. एखाद्या गंभीर शंकेनं ग्रासून गेल्यासारखं अचानकच छोट्या राजकुमारानं मला विचारलं :

“मेंढ्या लहान-लहान झुडपं खातात हे अगदी खरं, नाही का?”

“अर्थातच, ते खरं आहे.”


“वाः! किती बरं वाटलं हे ऐकून!”

मेढयांचं झुडप खाणं हे एवढं महत्वाचं का असावं ते काही मला कळलं नाही. पण मग त्यानं पुढे विचारलं.

“म्हणजे त्या बाओबाब पण खातच असणार?”

“बाओबाब म्हणजे काही झुडपं नव्हंत...” त्याच्या लक्षात आणून देत मी म्हटलं, “उलट ती झाडं चांगली किल्ल्यांसारखी उंच असतात. आणि हत्तींचा मोठ्ठा कळप जरी तू जाताना बरोबर नेलास तरी सगळे हत्ती मिळून बाओबाबचं एक झाडही फस्त करू शकणार नाहीत.”

हत्तीच्या कळपाच्या कल्पनेनं त्याला फारच हसू फुटलं.



“एवढे हत्ती ग्रहावर मावणार कसे? आपल्याला तर त्यांना एकावर एक रचूनच ठेवावं लागेल.” तो म्हणाला, त्यानंतर मग मुद्द्याची गोष्ट सांगत तो म्हणाला, “मोठे वृक्ष होण्यापूर्वी सुरवातीला बाओबाबपण छोटी झुडपंच असतात.”

“अगदी बरोबर आहें. पण मेंढीनं बाओबाब कशाला खायला हवे आहेत?” लगेचच तो म्हणालाः

“अं. . ? त्यात काय मोठंसं?”

. . .जसं काही सगळं मुळी स्पष्टच तर होतं, त्यात सांगण्यासारखं असं त्याला काहीच वाटत नव्हतं. मला मात्र, त्याच्या मदतीशिवाय, एकटयानंच, त्या प्रश्नाचं स्वरूप नीट समजून घ्यायला खूप डोकं चालवावं लागलं.

म्हणजे खरोखरच, छोट्या राजकुमाराच्या ग्रहावरही इतर ग्रहांवर असतात तशाच चांगल्या वनस्पतींच्या चांगल्या बिया होत्या आणि वाईट वनस्पतींच्या वाईट बिया. पुन्हा बिया काही डोळ्यांना दिसत नसतात. जमिनीखालच्या काळोख्या थरांमधे खूप खोलवर त्या मस्त झोपा काढतात. मग त्यातल्या एखादीला जागायची इच्छा होते आणि ती आळोखेपिळोखे द्यायला सुरुवात करते. आधी लाजतच असते जरा, पण मग तिला फुटणारा छानसा छोटासा अंकूर हळूच सूर्याच्या दिशेनं बाहेर पडतो. जर तो अंकूर गाजराचा किंवा गुलाबाचा असेल तर मग तो वाढू द्यायला काहीच हरकत नसते. पण जर का तो अंकूर एखाद्या वाईट वनस्पतीचा असेल तर मात्र त्याची ओळख पटताक्षणीच, ताबडतोब त्याला न�ट करायला हवा.

तर, म्हणजे या पिटुकल्या राजपुत्राचं घर असलेल्या ग्रहावरदेखील त्या भयंकर बिया होत्याच आणि या भयंकर बिया म्हणजेच बाओबाबच्याच बिया होत्या. ग्रहावरची सगळी जमीनच त्यांच्यामुळे दूषित झाली होती. बाओबाब ही अशी वनस्पती आहे की तिच्याकडे लक्ष द्यायला तुम्हाला जरासा उशीर झाला तरी मग तुम्हाला तिच्यापासून कधीच मुक्तता नाही. संपूर्ण ग्रहच ती व्यापून टाकते. आपल्या मुळांनी ते त्या ग्रहाला खोल-खोल खणत जातं आणि ग्रह फारच लहान असेल आणि बाओबाब खूप असतील तर बाओबाबची मुळं ग्रहाची शकलंशकलं करून टाकतात.

“हा शिस्तीचा प्रश्न आहे.” जरा वेळानं राजकुमार मला म्हणाला, “आपले प्रातर्विधी आटोपल्यानंतर सकाळी, आपण आपल्या ग्रहाचं आन्हिकही काळजीपूर्वक उरकायला हवं असतं. सुरुवातीला बाओबाबची रोपं गुलाबाच्या रोपांसारखी दिसत असतात. पण त्यांचं वेगळेपण कळल्याबरोबर आपण त्यांना उपटून टाकलं पाहिजे. सगळीच्या सगळी बाओबाबची रोपं आपण नियमितपणे उपटलीच पाहिजे. हे काम फार कंटाळवाणं असतं, पण तरी तसं त्या मानानं सोपंही असतं!”

आणि एक दिवस तो मला म्हणाला, “तू आता याबद्दलं एक छान चित्र काढ बघू, म्हणजे मग तू जिथे राहतोस तिथल्या मुलांना या साऱ्याची नीट कल्पना येईल आणि ते जेव्हा कधी प्रवासाला निघतील त्यावेळेस त्यांना या साऱ्या माहितीचा खूप उपयोग होईल, नाही का?” आणि पुढे मग तो म्हणाला, “कधी-कधी एखादं काम पुढल्या दिवसावर ढकललं तर काही फारसं बिघडत नाही. पण बाओबाबच्या बाबतीतलं काम पुढे ढकलणं म्हणजे मोठं संकटच ओढवन घेणं. मला एक ग्रह ठाऊक आहे. तिथे एक आळशी माणूस राहात होता. त्यानं तीन बाओबाबकडे दुर्लक्ष केलं. . .”

मग छोट्या राजकुमारनं दिलेल्या सूचनांप्रमाणे मी त्या ग्रहाचं चित्र काढलं. कुणाला उपदेश करणं ही गोष्ट काही माझ्या आवडीची नाही. पण आपल्याला बाओबाबच्या धोक्याची जाणीवच इतकी कमी असते, आणि जर कुणी एखाद्या लघुग्रहावर हरवला आणि तिथे बाओबाब आढळले तर त्याला त्यापासून केवढा भयंकर धोका निर्माण होईल. म्हणून, नेहमीचा नियम मोडून, मी तुम्हाला सांगतो :“मुलांनो! बाओबाबपासून जपून रहा!”

माझ्यासारखेच, माझे मित्रही, ह्या धोक्याच्या अस्तित्वाबद्दल, आजपर्यंत अंधारात होते. त्यांना त्या

भयंकर धोक्याची जाणीव नीट करून द्यावी म्हणूनच मी ह्या चित्रावर एवढी मेहनत घेतली आहे. त्यासाठी हा त्रास घेणं जरुरीचं होतं. तुम्ही कदाचित स्वतःशी म्हणाल, की ह्या पुस्तकातली इतर चित्राइतकी झकास आणि परिणामकारक का बरं नसावीत? त्याचं उत्तर अगदी साधं आहे. मी तसा खूप प्रयत्न केला, पण मला त्यात यश आलं नाही! मी जेव्हा बाओबाबचं चित्र काढलं ना, तेव्हा बाओबाबचा धोका असलेल्यांबद्दल वाटणाऱ्या काळजीनं, तळमळीनं मी नुसता भारावून गेलो होतो. परिस्थितीच अशी काही तातडीची होती की मी कमालीच्या उत्साहानं कामाला लागलो आणि मग त्यामळे मी माझ्या स्वतःच्या कुवतीपेक्षाही बाओबाबचं चित्र अधिक चांगलं काढून गेलो.

## 6



कित्येक दिवस निवांतपणे सूर्यास्त पाहात राहाणे हा एवढाच तुझ्या जिवाला विरंगुळा म्हणून असायचा. आणि हे मला कळलं ते चौथ्या दिवशी. त्या दिवशी तू म्हणालास :

“मावळता सूर्य मावळताना पाहात रहाणं हे मला अतिशय आवडतं. चल ना, आपण आत्ताच्या आत्ता सूर्यास्त पाहायला जाऊ या...”

“अरे, पण त्यासाठी थोडं थांवायला हवं.”

“थांवायचं?... ते कशासाठी?”

“सूर्यास्ताची वेळ होण्यासाठी.”

तू जरा आश्चर्यात पडल्यासारखा वाटलास, मग स्वतःशीच हसलास आणि म्हणालास :

“मला आपलं नेहमी माझ्याच ग्रहावर असल्यासारखं वाटत असतं.”

आणि खरंच, अमेरिकेत जेव्हा दुपास असते तेव्हा फ्रान्समधे सूर्य मावळता, हे सगळ्यांना खूप माहित असतं. तेव्हा सूर्यास्त पाहण्यासाठी एका मिनिटात फ्रान्सला पोहोचण्याचाच काय तो प्रश्न! दुर्दैवानं फ्रान्स फार–फार लांब आहे. पण तुझा त्या छोट्याशा ग्रहावर, खुर्ची जरा काही पावलं सरकवली की तुला पुरेसं असायचं. मनात येईल त्या–त्या वेळी तू दिवस ढळताना आणि संधिप्रकाश पसरताना पाहू शकत होतास.

“एक दिवस तर मी त्रेचाळीस वेळा सूर्यास्त होत असताना पाहिला.”

तू मला म्हणालास आणि जराशानं पुन्हा म्हणालास :

“तुला माहिती आहे?... आपण खूप उदास होऊन जातो ना, त्यावेळी सूर्यास्ताचं दर्शन घ्यावंसे फारफार वाटत असतं.”

“म्हणजे, चव्वेचाळीस सूर्यास्त पाहिलेस त्या दिवशी . . . तू एवढा का उदास होतास ?”

यावर तू काहीही बोलला नव्हतास .

## 7

पाचव्या दिवशी, नेहमीसारखंच त्या मेंढीमुळे छोट्या राजकुमाराच्या आयुष्यातलं हे गुपित कळलं . बरेच दिवस तो ह्या गोष्टीचा विचार स्वतःशीच करीत असला पाहिजे . त्याचाच परिणाम असावा बहुधा की, एक दिवस त्यानं कोणत्याही प्रस्तावनेशिवाय अचानकच विचारलं :

“मेढी झुडप खाते, तशी फुलंदेखील खाते का ?”

“मेंढीला जे–जे सापडेल ते–ते फस्त करीत असेत .”

“काटे असणारी फुलंसुद्धा ?”

“हो . काटे असणारी फुलंदेखील खाऊन टाकते मेंढी .”

“मग . . . मग ते काटे, त्यांचा उपयोग तरी काय ?”

मला ते माहित नव्हते . शिवाय त्यावेळेस मी एक पक्का जाम बसलेला स्क्रू उघडण्याच्या खटाटोपात होतो, फारच काळजीत होतो . कारण माझ्या विमानातला बिघाड मला आता गंभीर स्वरूपाचा वाटू लागला होता . माझं पिण्याचं पाणीही सारखं कमी–कमी होत चाललं होतं . त्या काळजीचा भस्मासूर मला सारखा भेडसावत होता .

“मग ते काटे . . . त्यांचा काय उपयोग ?”

एकदा विचारलेल्या प्रश्नाचा पिच्छा पुरवत राहायचं हा या इटुकल्या राजकुमाराचा खाक्या . इकडे मी आपल्याच काळजीत चूर . काहीतरी बोलायचं म्हणून म्हटलं :

“काटे त्यांचा काहीही उपयोग नसतो . निव्वळ द्वाडपणा म्हणून फुलं काटे बाळगीत असतात .”

“असं का!”

तो जरा अबोल झाला . नंतर थोडयाशा त्राग्यानंच पुढे म्हणाला :

“माझा तुझ्यावर मुळीच विश्वास नाहीये . फुलं किती नाजूक असतात . . . आणि भोळीदेखील, जमेल तसं स्वतःला जपत असतात . काट्यांमुळे त्यांना खूप सुरक्षित वाटतं . काटे म्हणजे त्यांची जाणू काही शास्त्रंच आहेत असं त्यांना वाटत असतं .”

मी काहीच बोललो नाही . त्यावेळेस वैतागून मी स्वतःशीच म्हणत होती, “आता जर का हा स्क्रू निघाला नाही तर मी सरळ त्याला हातोडयानं ठोकूनच बाहेर काढणार .” छोट्या राजकुमारानं पुन्हा माझ्या विचारात व्यत्यय आणला :

“आणि तू, तुला वाटतं की, ती फुलं . . .”

“पाही बाबा, मुळीच नाही! मला काहीही वाटत नाही! त्यावेळेस पहिल्यांदा मला जे सुचलं, तेवढंच ते मी तुला सांगतिलं, आणि तू बघतोयस ना, की मी किती महत्वाच्या कामात गुंतलोय ते ?”

ह्यावर अतिशय आश्चर्यचकित होऊन त्यानं माझ्याकडे पाहिलं आणि तो म्हणालाः

“महत्वाचं काम ?”

आणि तो पुन्हा माझ्याकडे पाहातच राहिला . माझ्या हातात हातोडा होता, माझी बोटं तेलामुळे काळी झालेली होती . ज्या वस्तूवर ओणवून मी काम करीत होतो, ती त्याला फारच ओबडधोबड

वाटत होती.

"तू आत्ता मात्र अगदी मोठ्या माणसांसारखं बोललास हू!"

तो असं म्हणाला आणि मी जरा ओशाळलोच. आणखी निर्दयपणा करीत तो पुढे म्हणाला :

"तू नुसता गडबड-गोंधल करतायस... सगळं काही एकात एक गुंतवून टाकतोएस!" – भलताच चिडला होता तो आता. आपल्या सोनेरी बटा वाऱ्यावर जोरजोरनं उडवीत होता.


"मला एक ग्रह ठाऊक आहे, तिथे एक लालबुंद माणूस रहातो. त्यानं आयुष्यात कधीही काहीही केलेलं नाही. आयुष्यात नाही कधी एखाद्या फुलाचा वास घेतला, की नाही कधी आकाशातला तारा पाहिला. कधी कुणावरसुद्धा प्रेम केलं नाही त्यानं एक आकडयाच्या बेरजा सोडल्या तर खरोखरी त्यानं काहीसुद्धा केललं नाही, आणि तरीदेखील सगळा दिवस तो तुझ्यासारखंच म्हणत असतो, 'मी मोठ्या महत्वाच्या कामात गुंतलोय, मी मोठ्या महत्वाच्या कामात गुंतलोय,' आणि फक्त एवढयानंच तो कसा गर्वानं फुगलेला असतो. तो काय माणूस म्हणायचा! दगड आहे नुसता....! "

"काय ?"

"द.. ग...ड."

छोटा राजकुमार रागानं नुसता फणफणलेला होता. जराशानं पुढे म्हणाला :

"हजारो वर्षांपासून फुलं काटे वाढवताहेत आणि तरीही मेंढया फुलं खाताहेत. ज्या काटयांचा काडीमात्र उपयोग नाही, ते काटे वाढावेत म्हणून फुलं एवढा त्रास का करून घेतात, हे शोधण्याचा प्रयत्न म्हणजे खरी म्हत्वाची गोष्ट नाही का ? फुलं आणि मेंढयांचा हा झगडा काय महत्वसचा नीहीये ? एका लठ्ठ, लालबुंद माणसाच्या आकडेमोडीपेक्षा हा झगडा काय कमी महत्वाचा आहे ? आणि मी...! माझ्या ग्रहावरचं ते फूल, मला माहित असलेलं जगातलं एकुलतं एक असं ते सुंदर फूल ... शोधूनही सापडायचं नाही असं दुर्मिळ...! एाक सकाळी, आपण काय करीत आहोत याचा जराही विचार मनात न आणता, एक छोटीशी मेंढी ते एक झटक्यात खुशाल नाहीसं करू शकते... अगदी सहजपणे... तुला ते महत्वाचं वाटत नाही ?"



राजकुमार रागानं नुसता लालेलाल होऊन गेला होता. "जर कुणी एखाद्या फुलावर प्रेम करीत असील, त्याचं तू फूल हजारो तारे व ग्रहांमधल्या फक्त त्याच्या एका छोटयाशा ग्रहावरच उमललं असेल, तर त्याला आपल्या ताऱ्याकडे नुसता एक दृष्टिक्षेप टाकणंदेखील पुरू शकतं. तो मनाशी म्हणत असतो : 'माझं फूल त्या तिथं कुठेतरी आहे...' आणि त्याचं ते फूल मेंढीनं खाल्लं तर.. तर ते सारे तारेसुद्धा त्याच्या लेखी काळेठिक्कर होऊन जातात... आणि तुला वाटतं की हे सारं काहीच महत्वाचं नाही..."

यापुढे त्याला काही बोलवेचना. तो एकदम हुंदके देऊन ओक्साबोक्शी रडू लागला.

आता रात्र झाली होती. मी माझ्या हातातली माझी अवजारं बाजूला केली. नाहीतरी मला त्यांचा कंटाळाच आलेला होता. आणि या क्षणी मी हातोडी, तो स्क्रू किंवा तहान आणि अगदी मृत्यूही... यांचं काहीतरी महत्व होतं का? आता, माझ्या ग्रहावर, माझ्या पृथ्वीवर आलेल्या या छोट्याशा राजपुत्राची समजावणी करायला हवी होती. त्याला शांत करायला हवं होतं. मी त्याला माझ्या अगदी जवळ ओढून घेतलं आणि हळू-हळू त्याला डोलवू लागलो. डोलवता-डोलवता मी त्याला समजावत होतो.

“अरे, ज्या फुलावरन तू एवढं प्रेम करतोस, त्याला कसलाही धोका नाहीये बरं! तुझ्या त्या मेंढच्या तोंडावर बांधून टाकायला मी तुला जाळी काढून देईन, त्या फुलाभोवती ठेवायला एक छोटंसं कुंपण काढून देईन, आणि शिवाय मी तुला...”

त्याची आता आणखी समजूत कशी घालावी ते मला कळेचना. आपल्याकडून काही चुकलंय की काय अशा शंकेनं मी अगदी गोंधळून गेलो. त्याला कसे समजवावं, त्याच्या मनातल्या शंका दूर कशा कराव्यात आणि त्याला पुन्हा पहिल्यासारखा हसताखेळता करा करावा या विचारात मी पडलो होतो. खरंच.. अश्रूंची दुनिया ही अशीच किती गूढ असते, नाही?

## ८

लवकरच मला त्या फुलाबद्दल आणखी बरंच कळलं. ह्या छोट्या राजकुमाराच्या ग्रहावर नेहमी अगदी साधी एकेरी पाकळ्यांची फुलं उमलायची. त्यांनी फारशी जागा लागतच नसे, कुणालाही त्यांचा ताप नसायचा. एका सकाळी गवतात उमलायचं आणि त्याच संध्याकाळी शांतपणे कोमेजून जायचं. पण त्या फुलाचा अंकूर मात्र एक दिवस अचानकच जमिनीबाहेर डोकावला. त्याचं बी कुठून आणि कसं आलं होतं कुणास ठाऊक! अतर कुठल्याही अंकुराशी जरासंही साम्य नसलेल्या ह्या आगळ्या अंकुराचं राजपुत्र एखाद्या नव्याच प्रकारच्या बाओबाबचं रोपटं निघायचं.

लवकरच ते रोप वाढायचं थांबलं आणि आता त्याला फूल येणार असं वाटायला लागलं. त्या झाडावर टपोरलेली ती कळी पहिल्यांदा जेव्हा राजपुत्रानं पाहिली तेव्हाच त्याला कळून चुकलं की इथे काहीतरी विलक्षणच सौंदर्य प्रकट होणार आहे. आपल्या हिरव्या आवरणाखाली ती कळी सावकाश आपला पोशाख चढवीत होती, मोठ्या काळजीपूर्वक ती त्यांचे रंग निवडत होती, त्यांची रचना करीत होती. त्या गावठी पॉपीच्या फुलासारखं तिला काही वाटेल तशा दुमडलेल्या पाकळ्यांनी कस्संही आपलं गबाळ्यासारखं उमलायचं नव्हतं. बस् ती फक्त एका सौंदर्यसम्राज्ञीच्या डौलातच हाजिर होणार होती. ओहो!! खरोखर फारच नखरेल होती तो!

तिचा हा असर रहस्यमय साजशृंगार कित्येक दिवस चालला होता आणि मग, एका सकाळी, अगदी बरोब्बर सूर्य उगवतानाच तिनं आपली ओढणी बाजूला सारली. किती कौशल्यानं तिनं आपला साजशृंगार केला होता! आणि आता मात्र जशी काही नुकतीच जाग आलीय असा आव आणीत, एक नाजुकशी जांभई देत ती म्हणाली :

“आहा! मला अजून नीचशी जाग आली नाहीय. माफ करा हं. माझ्या पाकळ्या अजून तशा विस्कटलेल्याच आहेत.”

छोट्या राजकुमाराच्या नजरेतून मात्र नुसतं कौतुक ओसंडत होतं!

“किती सुरेख आहात हो तुम्ही!”

“खरंच का?” ती फुलराणी गोड आवाजात म्हणाली.

“आणि हा आभाळातला अरुण आणि मी... अगदी एकाच मुहूर्तावर आलो आहोत, नाही का?”

ही जराशी शिष्ट आहे ह्याची राजकुमाराला कल्पना आलीच, पण तरीदेखील,.. काय विलक्षण

सुंदर होती ती!

"मला वाटतं, आता माझ्या न्याहरीची वेळ झालीय. माझी काही सोय करू शकाल का?"

ती एवढं म्हणाली मात्र, आणि छोटया राजकुमाराची कशी नुसती धांदल उडून गेली! आधी त्यानं एक थंडगार आणि स्वच्छ अशी पाण्यानं झारी भरून घेतली, आणि बाईसाहेबांची अगदी उत्तमपैकी बडदास्त राखली. मग तिच्या त्या एकेक आढ्यतेखोर मागण्या वाढतच राहिल्या आणि राजपुत्र त्यात अगदी मनापासून गुंतून गेला. अशा नखरेल लोकांशी जुळवून घ्यायचं तसे अवघडच असतं म्हणा. म्हणजे काय, की एकदा स्वतःच्या त्या चार काट्यांबद्दल ती आपली सरळ त्याला म्हणते काय –

"येऊ देत आता त्या वाघाला इथे, दाखवूच देत त्याला आपले पंजे!"

"अहो पण... इथे ग्रहावर काही वाघबीघ नाहीयेत." राजकुमाानं तिला अडवलं, "आणि शिवाय वाघ काही पालापाचोळाही खात नाहीत."

"मी म्हणजे काही पालापोचाळा नाहीये..." फुलराणीनं गोडपणे हलकेच म्हटलं.

"माफ करा हं..."

"मला वाघाची मुळीच भीती वाटत नाही. पण वाऱ्याच्या झोताला मात्र मी फारच घाबरते. मला वाटतं तुमच्याकडे एखादा वारा अडवायला पडदा वगैरा मिळू शकेल, नाही?"

"वाऱ्याच्या झोताची भीती ... मग या रोपाची काही धडगत दिसत नाही," राजकुमाराच्या मनात आलं. "ही फुलराणी म्हणजे जरा विलक्षणच दिसतेय..."

"रात्री मला काचेच्या घुमटात ठेवा बाई, कारण तुमच्या इथे म्हणजे फारच थंडी आहे. मी जिथून आले ना ..."

पण इथे ती अडखळली. ती जर इथे एका बीजाच्या रूपात आली होती, तर तिला इतर जगांची माहिती असणं कसं शक्य होतं? खोटं बोलताना आपण पकडलया जाणार होतो हे लक्षात आल्यावर ती जरा ओशाळलीच. आणि तरीदेखील राजकुमाचीच काहीतरी चूक झालीय असं दाखवायला उगाचाच तिनं दोनतीनदा जरा खोकल्यासारखं केलं आणि पुन्हा सुरू केलं :

"तो पडदा..."

"हो हो, मी तो आत्ता आणायलाच निघालो होतो, पण तुम्ही माझ्याशी बोलत होतात ना!"

हे ऐकल्यावर तिनं मुद्दामच जरा आणखी खोकल्यासारखं केलं, म्हणजे आपल्या हातून काही तरी मोठी चूक घडली आहे असं वाटून त्याला खूप वाईट वाटावं असं तिला वाटत होतं.

राजकुमारचं खरं तर... तिच्यावर मन जडलं होतं आणि तरीही मनातल्या मनात त्याला जरा संशयच वाटायला लागला. तिचा आरोप त्यानं मनाला इतना लावून घेतला आणि मनातल्या मनात तो फार दुःखी होऊन गेला.

"खरं म्हणजे त्यावेळी मी तिच्या बोलण्याकडे एवढं लक्ष द्यायला नको होतं." मला आपल्या विश्वासात घेत तो म्हणाला, "फुलांच्या बोलण्याकडे कुणी लक्ष द्यायचं नसतं अरे, त्यांच्याकडे फक्त बघत राहायचं असतं... आणि त्यांचा मधुर गंध आपल्या श्वासात भरून घ्यायचा असतो. माझ्या फुलराणीचा सुगंध साऱ्या ग्रहावर दरवळला होता. पण तिच्यातल्या त्या डौलामुळे मला त्या सुगंधचा आस्वाद नीटसा घेता आला नाही. तिनं केलेल्या वाघाच्या त्या उल्लेखामुळे मी फार दुःखी झालो. माझं मन तिच्याबद्दलच्या काळजीनं अगदी हळवंहळवं गेलेलं असणार..."

आणि अगदी विश्वासनं तो पुढे असाच बोलत राहिला –

"खरंच, मला काही कळेनासंच झालं, मी तिच्या कृतीवर, म्हणजे वागण्यावर, विश्वास ठेवायला हवा होता, तिच्या शब्दांवर नाही. तिनं मला तिच्या सौंदर्यानं आणि सुगंधानं किती मुग्ध केलं होतं.

. . मी तिच्यापासून कध्धी कध्धी दूर जायला नको होतं . . . तिच्या त्या लबाडीमागे दडलेली, तिला माझ्याबद्दल वाटणारी ओढ मी जाणून घ्यायला हवी होती . किती निर्व्याज . . . कशी साधी भोळी असतात ना ही फुलं! पण माझ्या फुलराणीला जीव कसा लावावा हे समजायला मीही फार लहानच होतो तेव्हा . . .”

## 9

मला वाटतं आपल्या मुक्ततेसाठी राजपुत्राानं स्थलांतर करणाऱ्या पक्षयांची मदत घेतली असावी . निघायच्या दिवशी सकाळी त्यानं आपला ग्रह अगदी नीटनेटका आवरुन ठेवला . जागृत असलेल्या ज्वालामुखींची नीच झाडलोट केली . होय, त्याच्या ग्रहावर दोन जागृत ज्वालामुखी होते आणि त्यांचा उपयोग त्याला सकाळची न्याहरी गरम करुन घेण्यासाठी व्हायचा . त्याच्या ग्रहावर काही निद्रिस्त ज्वालामुखीही होते . “त्यांचा काम नेम ?” असं म्हणत तो त्यांचीही साफसफाई करायचा . त्यांना अगदी स्वच्छ ठेवायचा .

“झाडून पुसून स्वच्छ ठेवलं म्हणजे ते कसे संथ आणि स्थिर जळत रहातात . त्यांचा उद्रेक होत नाही . ज्वालामुखींचा उद्रेक म्हणजे धुराडयातून येणाऱ्या ज्वालांसारखाच असतो .”

आपल्या पृथ्वीवरचे ज्वालामुखी स्वच्छ करायला आपण फार लहान पडतो आणि म्हणूनच मग त्यांच्या उद्रेकांमुळे आपल्यावर इतकी सारखी संकटं कोसळत असतात .

शेवटच्या बाओबाबचा अंकूर उपटताना राजपुत्र जरा साशंकच होता . आपल्याला आता पुन्हा कधीच परतावंसं वाटणार नाही असं काहीसं त्याला वाटत राहिलं . तरीही, ही नेहमीची कामं त्याला त्या दिवशीही मोठी महत्वाची वाटली आणि मग जेव्हा त्यानं फुलराणीला पाणी दिलं आणि तिला काचेच्या घुमटात ठेवायची वेळ आली तेव्हा त्याचं मन अगदी भरुन आलं .

“बरंय मग . .  बाय . .” तो तिला म्हणाला .

“गुड बाय . . .” तो पुन्हा म्हणाला .

तिला एकदम खोकला आल्यासारखं झालं; पण तो सर्दीपडशानं येणारा खोकला नव्हता .

“माझं जरा चुकलंच . . .” अखेर ती कसंबसं म्हणाली . “क्षमा कर मला . . . आणि तू . . . सुखी होण्याचा प्रयत्न कर .”

तिच्या अशा साध्यासुध्या बोलण्यानं तो चकितच झाला, कारण उगाचच काहीतरी आरोपबिरोप करुन बोलण्याची तिची सवय होती .

तो स्तब्धच उभा राहिला, दोघांच्यामधे तो काचेचा पडदा . ही मधुर शांतता त्याला कोडयात टाकीत होती .

“खरंच . . . माझं प्रेम आहे रे तुझ्यावर . . .” फुलराणी त्याला म्हणत होती . “तुला ते कधी कळलंच नाही . . . अर्थात माझ्याच चुकीमुळे . . . पण तूदेखील माझ्यासारखाच वेडा निघालास . सुखी राहा . तो काचपडदा बाजूमलाच राहू दे; मला नकोच आहे तो . . .”

“पण मग वारा . .  ”

“तेवढं काही पडसं झालेलं नाहीय मला . . .रात्री गार वाऱ्याची झुळूक आली की . . . मला उलट बरंच वाटेल . काही झालं तरी मी फुलराणी आहे!”

“पण इतर प्राणी . . .”

“आता मलाच जर फुलपाखरांशी खेळावंसं वाटत असेल, तर दोनचार सुरवंटांची त्रास सहन करायला हवा . फार सुंदर असतात नाही फुलपाखरं! ती माझ्याभोवती भिरभिरताहेत या


कल्पनेनंदेखील मला किती आनंद होतोय . . . नाहीतरी माझ्याकडे दुसरं कोण येणाराय ? . . . उरला तो इतर प्राण्यांचा प्रश्न ! मला त्यांची मुळीसुद्धा भीती वाटत नाही . माझ्याजवळ माझे हे काटे आहेत ना !” आणि मोठ्या भाबडेपणानं तिनं तिचे ते चार काटे मला दाखवले आणि म्हटलं :

“आता असा घुटमळू नकोस . त्याचाच माझ्या मनाला जास्त त्रास होतो . तू जायचं ठरवलं आहेस ना, मग एकदाचा जा पाहू . जा . . . जा, ना . . .”

आपल्याला रडू फुटलेलं त्यानं पाहू नये असं तिला वाटत होतं . इतकी मानी होती ती फुलराणी . . . !

## 10

तो आता लघुग्रह 325, 326, 327, 328, 329 आणि 330 यांच्या परिसरात होता . काम शोधावं, तसंच ज्ञानातही भर घालावी म्हणून त्यानं त्या ग्रहांना भेट द्यायला सुरुवात केली होती .



पहिला ग्रहावर एक राजा होता . त्यानं जांभळ्या व पांढऱ्या लोकरीचा पोशाख परिधान केला होता आणि तो एका अतिशय साध्या पण भव्य अशा सिंहासनावर बसला होता .

“अरे वा ! वा ! हा आला एक प्रजाजन !”

राजकुमार दिसताच राजा उदगारला .

“ह्या नं तर मला पूर्वी कधीच पाहिलेलं नाही आणि तरीही कसं काय बुवा मला एकदम ओळखलं ?” राजकुमार स्वतःशीच म्हणाला .

राजे लोकांचा हिशेब अगदी सरळ असतो हे त्याला ठाऊक नव्हतं . त्यांना काय, समोरचा प्रत्येकजण आपला प्रजाजनच वाटत असतो .

“जरा जवळ ये पाहू म्हणजे मला तुला नीट पाहता येईल .” राजा म्हणाला . आपण कुणाचे तरी राजे आहोत ह्याचा त्याला खूपच अभिमान वाटत होता .

बसायला कुठे जागा दिसतेय का म्हणून राजकुमारानं इकडे तिकडे नजर टाकली .

पण ग्रहावरची सगळीच्या सगळी जागा राजाच्या त्या शानदार, सुंदर, पांढऱ्या झग्यानंच व्यापली होती . मग राजकुमार आपला उभाच राहिला . . . आणि शेवटी खूप थकल्यामुळे त्याला एक जांभईच आली .

“राजाच्या उपस्थितीत जांभई देणं हे शिष्टाचाराला सोडून आहे; म्हणून मी तुला जांभई देण्याची मनाई करीत आहे .” राजा म्हणाला .

"अहो पण माझा काही इलाज नाही त्याला. जांभई येतेच आपली आपोआप, ती थांबवायची कशी?" राजकुमार अगदी गांगरून गेला होता. "मी नं, खूप लांबचा प्रवास करून येतो आहे आणि कित्तीतरी दिवस झोपलोच नाहीय मी."

"असंअसं. तर मग मी तुला आता जांभई देण्याची आज्ञा करतो." राजा त्याला म्हणाला. "नाहीतरी मीही कित्येक वर्षांत कुणाला जांभई देताना पाहिलं नाहीये. जांभयांबद्दल मला तसं कुतूहलच आहे बरं का. चल बरं, दे आता पुन्हा जांभई. ही माझी आज्ञा आहे."

"बापरे, आता मात्र मला संकोच वाटतोय." लाजून लाल होत राजकुमार म्हणाला. "मला आता जांभईच येत नाहीये."

"अं... अं... बरं मग, मी तुला आता आज्ञा करतो की कधीही पुढे एकदा देऊन टाक जांभई आणि एकदा..." राजा किंचित चाचरला, नंतर जरासा वैतागलेला दिसला. कारण आपल्या आज्ञेचं पालन सगळ्यांकडून झालंच पाहिजे या बद्दल त्याचा आग्रहच असायचा. अवज्ञा मुळी त्याला खपायचीच नाही. काही झालं तरी सार्वभौम राजा होता तो. पण तसा तो खूप चांगलाही होता. आणि म्हणून फक्त इतरांना पाळता येतील अशाच आज्ञा तो करायचा.

तो नेहमीच म्हणायचा, "समजा, जर मी माझ्या सेनापतीला आज्ञा दिली, की तू बाबा एक समुद्रपक्षी हो .. आणि त्यानं आज्ञापालन केलं नाही.. तर त्यात सेनापतीची थोडीच चूक असणार आहे? ती तर माझीच चूक असणार!"

"मी जरा बसू शकतो का?" राजकुमारानं जरा घाबरतच विचारलं.

"मी तुला बसण्याची आज्ञा करीत आहे." राजा गंभीरपणे म्हणाला आणि त्यानं आपल्या पांढऱ्या शुभ्र झग्यावरची एक लोकरी झालर ऐटीत सावरून घेतल्यासारखं केलं. पण राजकुमाराला मात्र आश्चर्यच वाटत होतं, कारण हा ग्रह तर अगदीच लहान होता; मग हा राजा राज्य तरी कुणावर करीत असावा बरं?

"महाराज..." तो म्हणाला, "प्रश्नाची माफी असावी..."

"ठीक आहे. ठीक आहे. मी तुला प्रश्न विचारण्याचा हुकूम करीत आहे." राजा घाईघाईनं म्हणला.

"महाराज... आप कुणावर राज्य करता?"

"कुणावर म्हणजे? प्रत्येक गोष्टीवर राज्य करतो मी." राजानं सहजपणानं उत्तर दिलं.

"प्रत्येक गोष्टीवर?"

स्वतःचा ग्रह, इतर ग्रह आणि इतर तारे या सर्वांकडे हलकेच अंगुलीनिर्देश करीत राजानं डौलात मान हलवली.

"ह्या सगळ्यांवर..." राजा ऐटीत म्हणाला; कारण राजेसाहेब काही नुसतेच सार्वभौम राजे नव्हते, तर त्यांची सत्ता विश्वव्यापीही होती!

"आणि हे सगळे तारे तुमची आज्ञा पाळतात?"

"अर्थातच... अगदी लगेच पाळतात. शिस्तभंग मला अजिबात चालतच नाही."

राजाच्या त्या अपार सत्तेचं राजकुमाराला नवलच वाटत राहिलं. त्याच्या मनात आलं, आपण स्वतः जर एवढ्या मोठ्या सत्तेचे असे धनी असतो तर... तर मग आपल्याला मनात येईल तेव्हा सूर्याला बुडत असताना पाहता आलं असतं; एका दिवसात चव्वेचाळीस वेळा, नाही... बहात्तर वेळा ... अंहं... शंभर किंवा दोनशे वेळासुद्धा आपण सूर्यास्त पाहिला असता!... आणि तेही स्वतःची खुर्ची जरादेखील हलवायला न लागता...!

मग त्याला, तो सोडून आलेल्या त्याच्या चिमुकल्या ग्रहाची आठवण झाली त्याला जरा उदास

वाटलं. म्हणून मोठा धीर करून त्यानं राजाला विनंती केली :

"महाराज, मला आत्ता सूर्यास्त पहायला आवडेल.. माझ्यावर एक कृपा करा... सूर्याला जरा मावळण्याची आज्ञा करा..."

"जरा का मी एखाद्या सेनापतीला फुलपाखरासारखं एका फुलावरून दुसऱ्या फुलावर उडण्याची आज्ञा केली, किंवा त्याला एखादं शोकनाट्य लिहायला सांगितलं, नाहीतर... तू एक समुद्रपक्षी होऊन जा अशी आज्ञा केली, आणि त्यानं ती आज्ञा पाळलीनाही, तर चूक कुणाची असेल?... त्याची मी माझी?"

"तुमचीच असेल, महाराज." राजकुमार निश्चयपूर्वक म्हणाला.

"बरोब्बर. ज्याला जे कर्तव्य पार पाडणं शक्य असेंल तेच पार पाडण्याची आज्ञा आपण त्याला दिली पाहिजे." राजा म्हणाला. "शहाण्या माणसाचीच सत्ता लोकांना मंजूर होऊ शकते. तू जर तुझ्या प्रजाजनांना सांगितलंस की समुद्रात उडया मारा... आणि मरा... तर? ते बंड पुकारतील, क्रांती घडवून आणतील. मी नेहमी उचित अशाच आज्ञा करीत असतो आणि म्हणूनच 'आज्ञापालन झालंच पाहिजे' असा आग्रह धरण्याचा मला हक्कच आहे."

"मिळेल, मिळेल तुला तुझा सूर्यास्तही मिळेल. जरूर मी सूर्याला तशी आज्ञा देईन, पण माझ्या शासनपद्धतीनुसार त्यासाठी परिस्थितीही तशी अनुकूल असण्याची मी आधी वाट पाहीन."

"परिस्थिती तशी अनुकूल तरी कधी होणार?"

"अं.. अं..!" करत राजानं एक भलं मोठं पंचांग उघडलं. "हं! ळं! ती असेल... केव्हा.. .केव्हा बरं? हं, आज सायंकाळी सात वाजून चाळीस मिनिटांनी, आणि त्यावेळी माझ्या आज्ञेचं पालन कसं काटेकोरपणे होतं ते दिसेलच तुला!"

राजकुमाराला जांभई आली. आपला सूर्यास्त हुकला याचं त्याला वाईट वाटत होतं, आणि शिवाय इथे कंटाळाही यायला लागला होता.

"मला आता इथे आणखी काही करण्यासारखं नाहीये... मी परत निघायचं म्हणतो." तो राजाला म्हणाला.

"तू जाऊ नकोस." राजा म्हणाला. आपल्यासमोर निदान एक प्रजाजन आहे याचाच त्याला अभिमान वाटत होता.

"जाऊ नकोस तू. मी तुला मंत्री करतो."

"मंत्री? कशाचा मंत्री?"

"अं...? न्यायमंत्री!"

"पण इथे न्याय देणार कुणाला?"

"कुणास ठाऊक..." राजा म्हणाला. "मी अजून काही माझ्या राज्याचा संपूर्ण दौरा केलेला नाहीये... खूप म्हतारा झालोय ना! इथे कुठे एखादी बग्गी ठेवायलाही जागा नाही, आणि पायी पायी फिरायचं म्हणजे मी फार थकून जातो."

"अस्सं अस्सं! पण मी तुमचा हा ग्रह आधीच पाहून आलोय." राजकुमार म्हणाला आणि पुन्हा एकदा जरासं वाकून त्यानं त्या ग्रहाची पलिकडची बाजू पाहिली.

"..तर मग तू स्वतःलाच न्याय दे." राजा म्हणाला. "सवार्त जर कोणती गोष्ठ कठीण असेल तर ती म्हणजे स्वतःला योग्य देणं. त्या मानानं इतरांना दोषी–निर्दोष ठरवणं सोपं असतं. तू जर स्वतःला योग्य रीतीनं पारखू शकलास तर मग नक्कीच तू एक मोठा बुद्धिवंत माणूस ठरशील."

"होय, खरं आहे आपण म्हणता ते. पण मला माझी पारख काय कुठेही आणि केव्हाही करता

येईल. तेवढ्यासाठी मी या ग्रहावर जास्त थांबायची आवश्यकता वाटत नाहीय."

"अं...?...हंहं! टाठवलं. मला वाटतं माझ्या ग्रहावर कुठेतरी एक म्हतारा उंदीर रहातो." राजा म्हणाला."रात्रि रोज मला त्याची खुडबूड ऐकू येते. अधूनमधून तू त्याला मृत्युदंड फर्मावीत जा. म्हणजे त्याचं जगणंमरणं तुझ्या न्यायावर अवलंबून रहात जाईल. मात्रा प्रत्येकवेळी शिक्षा, फर्मावून झाल्यानंतर तू त्याला शिक्षेची माफी देऊन टाकत जा. कारण आपण त्याच्याशी दयाळूपणानं वागलं पाहिजे. इथे आपल्या या ग्रहावर तो एकटाच तर आहे बिचारा."

"मला कुणालाही मृत्यूची शिक्षा देणं आवडत नाही." राजकुमार म्हणाला. "मी आता लागतोच कसा माझ्या मार्गाला."

"नको-नको, तू जाऊ नकोस रे..." राजानं विनवलं.

आता मनातल्या मनात त्याची निघण्याची तयारी होतीच. तरीही त्याला म्हाताऱ्या राजाला दुखवावंसं वाटत नव्हतं. म्हणून तो म्हणाला, "महाराजांच्या आज्ञेचं पालन शीघ्र व काटेकोरपणे व्हावं अशी जर महाराजांची इच्छा असेल तर महाराजानी मला योग्य अशी आज्ञा करावी. उदाहरार्थ, एका मिनिटाच्या आत येथून निघून जा असं मल सांगा. मला वाटतं, त्यासाठी परिस्थितीही अगदी चांगली, अनुकूल आहे."

बिचारा राजा यावर काहीच बोलला नाही. त्यामुळे राजकुमाराचं पाऊल जरासं अडल्यासारखं झालं. शेवटी दुःखद अंतःकरणानंच त्यानं राजाचा निरोप घेतला.

"मी तुला माझा राजदूत करतो..." राजा घाईघाईनं ओरडला. त्याच्या आवाजातून त्याची अधिकारवाणी जाणवत होती.

"काय विक्षिप्त असतात ही मोठी माणसं!" राजकुमार स्वतःशीच म्हणाला आणि त्यानं पुढचा प्रवास सुरू केला.

## 11

या दुसऱ्या ग्रहावर एक स्तुतिप्रिय माणसाचा निवास होता.

"अरे वा! वा! व! आला बुवा हा माझा एक चाहता!"

राजकुमार दिसताच तो दुरुन ओरडला. नाहीतरी स्तुतिप्रिय माणसांना सगळेजण आपले त्यांचे चाहतेच वाटत असतात!

"सुप्रभातम् " राजकुमारानं त्याला अभिवादन केलं. "तुम्च्याजवळ तर मोठी गंमतीदार टोपी दिसतेय." तो म्हणाला. "ती तुमच्या डोक्यावरची हॅट..."


"ही हॅट ना? अहो, ही माझी अभिवादन करण्याची हॅट आहे!" तो स्तुतिप्रिय माणूस म्हणाला. "म्हणजे काय आहे, की लोक जेव्हा टाळ्या वाजवून कौतुक करतात ना, तेव्हा ही हॅट उंचावून मी ते स्वीकारीत असतो. पण, दुर्दैवानं इकडे कुणी फिरकतच नाही हो."

"असं का?" राजकुमार म्हणाला. खरं तर तो स्तुतिप्रिय माणूस कशाबद्दल बोलतो आहे ते त्याला काही कळतच नव्हतं.

"अरे, तुझ्या दोन्ही हातांनी जरा टाळ्या वाजव की! "

त्यानं स्वतःच राजकुमाराला सुचवलं. मग राजकुमारानं वाजवल्या ठाळ्या. तशी त्या माणसानं अगदी अदबीनं आपली हॅट उंचावली आणि मान झुकवून नम्रतापूर्वक अभिवादन केलं!

"हे तर राजेसाहेबांपेक्षाही आणखीच गंमतीचं प्रकरण दिसतंय!"



राजकुमार स्वतःशीच म्हणाला. मग त्यानं जरा मजाज केली. त्याच्यासमोर तो पुन्हा-पुन्हा टाळ्या वाजवू लागला आणि तो स्तुतिप्रिय माणूस पुन्हा-पुन्हा टोपी काढून अभिवादन करू लागला!

त्ब्बल पाच मिनिटं असाच खेल चालला होता. मग मात्र राजकुमाराला तेच-तेच करण्याचा कंटाला आला.

"त्या हॅट्ला आता विश्रांती मिळावी म्हणून काय बरं करायला हवं?" त्यानं विचारलं.

पण त्या स्तुतिप्रिय माणससाचं लक्ष त्याच्या बोलण्याकडे थोडंच जाणार! स्तुतिप्रिय माणसांना ऐकू येते ती फक्त त्यांची स्तुती, बस दुसरं काही ऐकू शकत नाहीत ते.

"काय रे? तुला माझं खूप खूप कौतुक वाटतं ना रे?" त्यानं विचारलं.

"पर कौतुक वाटणं याचा अर्थ असा की या संपूर्ण ग्रहावर फक्त अस्मदिकच काय ते सगळ्यात सुंदर, सगळ्यात उत्तम पोशाख केलेले, सगळ्यात जास्त श्रीमंत आणि सगळ्यात जास्त हुशार आहेत असं तुला वाटणं."

"पण ह्या ग्रहावर तू एकटाच तर आहेस."

"तरीही तू माझं कौतुक केलं पाहिजेस. केलंच पाहिजेस तू माझ्यासाठी एवढं."

"बरं बुवा, वाटतं मला मुझं कौतुक." खांदे उडवीत राजकुमार म्हणाला. "पण दुसऱ्याकडून आपलं कौतुक करून घेण्यामधे तुला एवढं हरखून जाण्यासारखं काय वाटतं बुवा?" असं म्हणत राजकुमार सरळ तेथून पसार झाला.

"ही मोठी माणसं नक्कीच मोठी विक्षिप्त असतात..." असं मनाशी म्हणत तो आता पुढल्या प्रवासाला लागला.

## 12

पुढच्या ग्रहावर एक दारुडया रहात असे. राजपुत्रांची या ग्रहावरची भेट तशी अल्पकालीन होती. पण तरीही या भेटीमुळे राजपुत्र फार खिन्न होऊन गेला.

"तू काय करतो आहेस तिकडे?" त्यानं दारुडयाला विचारलं.



बाटल्यांच्या एका मोटया रिकाम्या झालेल्या होत्या आणि दारूनं भरलेल्या बाटल्यांची संख्याही काही कमी नव्हती.

“मी दारू पितोय.” रडवेल्या सुरात तो उत्तरला.

“पण कशाला पितोस तू दारू.”

“मला विसर पडायला हवा आहे.”

“कशाला विसर पडायला हवाय? काय विसरायचं आहे तुला?” एव्हाना राजकुमारला त्याची कीव आलेली होतीच.

“मला लाज वाटू शकते हे विसरायचंय.” मान खाली घालत, ओशाळल्या स्वरात तो म्हणाला.

“पण लाज कशाची वाटते तुला?” ह्याला खरंच काहीतरी मदत केली पाहिजे असं राजपुत्राला वाटायला लागलं.

“मी दारू पितो नं, ह्याचीच.” असं म्हणून त्याला पुढे काहीच बोलता येईनासं झालं. थोडयाच वेळात तो स्वतःची शुद्ध पुरती हरवून बसला. छोटा राजकुमार मात्र अगदी गोंधळून गेला.

“काय ही मोठी माणसं! कमालीची विक्षिप्त बुवा!” असं म्हणत त्याचा आणखी पुढचा प्रवास सुरु झाला.

## 13

चौथा ग्रह एका व्यापाऱ्याच्या मालकीचा होता. हा गृहस्थ कामात एवढा गढून गेला होता की राजकुमार तिथे आल्यावर त्याने मान वरसुद्धा केली नाही.

“नमस्ते!” राजकुमार म्हणाला. “अहो महाशय, तुमची सिगरेट पार विझून गेली आहे.”

“तीन, अधिक दोन, बराबर पाच; पाच अधिक सात, बरोबर बारा; बारा, अधिक तीन, बरोबर पंधरा. नमस्ते... पंधरा, आधिक सात, बरोबर बावीस; बावीस, अधिक सहा, बरोबर अठ्ठावीस... मला सिगरेट पुन्हा पेटवायला सवडड नाहीये... सव्वीस, अधिक पाच, बरोबर एकतीस ... उफ! म्हणजे सगळे मिळून एकूण पन्नास कोटी, सोळा लक्ष, बावीस हजार, सातशे एकतीस झालेत तर...!”

“पन्नास कोटी? पन्नास कोटी काय?” छोटया राजकुमारानं पुन्हा विचारलं.

आपल्याला आता माहीत झालंच आहे की राजकुमारानं एकदा एखादा प्रश्न विचारला की त्याचा तो पिच्छा साडणं काही शक्य नाही.

शेवटी एकदाची त्या व्यापाऱ्यानं मान वर केली आणि तो म्हणाला :

"गेली चौपन वर्ष मी इथे रहातोय. एवढ्या अवधीत फक्त तीनदा माझ्या कामात व्यत्यय आला. पहिल्यांदा म्हणजे सव्वीस वर्षांपूर्वी. एक भुंगा आला होता इथे. कुठून आला देव जाणे. पण अशी काही भुणभुण सुरू केली त्यानं की माझ्या बेरजेत चार चुका होऊन बसल्या, दुसऱ्यांदा, म्हणजे अकरा वर्षांपूर्वी, पुन्हा व्यत्यय! त्या वेळेस संधिवाताचा त्रास सुरू झाला. व्यायाम मुळी घडतच नाही ना आम्हाला, म्हणून. भटकत बसायला इथे कुणा लेकाला सवड आहे? . . . आणि तिसऱ्यादा म्हणजे . . . हं . . . हा आत्ताच . . तर काय म्हणत होतो मी? पन्नास कोटी . . ."

"पन्नास कोटी काय?" राजपुत्र आपला हेका कशाला सोडतोय!

व्यापाऱ्याला कळून चुकलं की उत्तर दिल्याशिवाय आपल्याला शांतता मिळणं शक्य नाही.

"पन्नास कोटी म्हणजे . . . त्या . . . केव्हातरी आपल्याला आकाशात छोट्या छोट्या गोष्टी दिसतात ना . . . त्या पन्नास कोटी."

"म्हणजे माशा?"

"मुळीच नाही. ते . . . ते चमकणारं रे . . ." तो व्यापारी म्हणाला.

"काजवे?"

"नाही नाही. त्या छोट्याशा रुपेरी वस्तू म्हणजे ज्यांच्यामुळे काही माणसं, म्हणजे खगोलशास्त्रज्ञ वगैरे, आपली दिवास्वप्नं रंगवत बसलेली असतात ना, त्या. मात्र मी तसला नाही हं. त्या मूर्ख माणसांसारखी दिवास्वप्नं पाहायला इथं कुणाला सवड आहे?"

"ओ! म्हणजे तुम्ही ताऱ्याबद्दल बोलताय तर!"

"अगदी बरोबर. तारेच तर म्हणतोय मी."

"आणि त्या पन्नास कोटी ताऱ्यांचं तुम्ही काय करता आहात?" राजकुमार विचारलं.

"अंहं, नुसते पन्नास कोटी नाहीत. पन्नास कोटी, सोळा लाख, बावीस हजार, सातशे एकतीस. बघ हं. या असल्या गोष्टी मी फार गंभीरपणे घेतो. माझं म्हणजे सगळं काही अगदी अचूक असतं."

"पण तुम्ही इतक्या ताऱ्यांचं करता तरी काय?" राजकुमारानं पुन्हा विचारलं.

"मी त्यांचे काय करतो?"

"हं."

"काही नाही. करीत काहीच नाही. ते फक्त मालकीचे आहेत माझ्या."

"तुमची या साऱ्या ताऱ्यांवर मालकी आहे?"

"होय."

"पण मला तर आधीच एक राजा भेटला होता आणि तो म्हणत होता की . . ."

"राजाची कशावरही मालकीबिलकी नसते. राजा फक्त राज्य करीत असतात. 'राज्य करतो म्हणे,' मालकी असणं आणि राज्य करणं ह्यात पुष्कल फरक असतो."

"पण ताऱ्यावर मालकी असण्यामधे तुम्हाला काय फायदा होता?"

"त्यामुळे मी श्रीमंत होतो."

"आणि श्रीमंत असण्याचा काय फायदा होतो?" राजकुमारानं पुन्हा विचारलं.

"श्रीमंत असल्यामुळे . . .जर कुणाला नवीन तरे सापडले तर ते मी विकत घेऊ शकतो!"

“हा लेकाचा त्या दारुडयाइतपतच शहाणा दिसतोय!” राजकुमार स्वतःशी म्हणाला.

तरीपण त्याला आणखी प्रश्न विचारायचे होतेच.

“ताऱ्यावर कुणा एखाद्याची मालकी कशी काय प्रस्थापित होऊ शकते?”

“का? न व्हायला काय झालं? तू सांग बरं मग ते कुणाकुणाच्या मालकीचे आहेत?” व्यापाऱ्यानं जरा त्राग्यानंच उलट विचारलं.

“मला काय माहीत? पण ताऱ्यांवर कुणीचीच मालकी नसते.”

“कुणाचीच नसते ना? मग तर ते माझ्याच मालकीचे आहेत! कारण कुणाच्याही आधी मीच त्यांच्या मालकीचा विचार केलेला आहे!”

“बस्स्? मालकी मिळवण्यासाठी तेवढं पुरतं?”

“अर्थातच. तुला जर एखादा हिरा सापडला आणि तो कुणाच्याही मालकीचा नसला, तर तो तुझा होतो, नाही का? कुणाचाही मालकी नसलेलं एखादं बेट जर तू शोधून काढलंस तर ते तुझ्याच मालकीचं ठरतं. आणि ते तुझं पेटंटही कसं बरं निश्चित होतं? बस् तसेच हे सगळे तारेही माझ्याच मालकीचे आहेत, कारण आजपर्यन्त कुणीही त्यांच्या मालकीचा विचार मनातसुद्धा आणला नाही.”

“होय, खरंच आहे तुझं म्हणणं!” राजकुमार म्हणाला. “पण ह्या सगळ्या ताऱ्यांचं तुम्ही काय करीत असता?”

“मी त्यांचा कारभार पाहतो.” व्यापारी म्हणाला. “मी ते पुन्हा पुन्हा मोजतो. काम फार कठीण आहे, पण अशी कठीण कामं माझ्यासारख्या गंभीर स्वभावाच्या व्यक्तीला आवडणारच.”

राजकुमाराचं अजूनही समाधान झालेलं नव्हतं. तो म्हणाला.

“जरा एखादा रेशमी गळपट्टा माझ्या मालकीचा असेल तर तो मी जवल बाळ्गू शकतो, त्याला गळ्याभोवती गुंडाळू शकतो, पाहिजे तेव्हा काढूनही टाकू शकतो. समजा एखाद्या फुलावर तुमची मालकी असेल तर ते फूल मी खुडून आपल्याबरोबर नेऊ शकतो, पण तुमचे हे तारे थोडेच तुम्ही असे आकाशातून तोडून बरोबर नेऊ शकणार आहात?”

“नाही. मी तारे तोडून काही बरोबर नेऊ शकत नाही. पण मी ते बैन्केत ठेवू शकतो की.” व्यापारी म्हणाला.

“बैन्क?... बैन्क म्हणजे काय असतं?”

“म्हणजे काय... की मी एका लहानशा कागदावर माझ्या ताऱ्यांची संख्या लिहितो आणि मग तो कागद एका खणात ठेवतो आणि नंतर मग तो खण कुलूप लावून बंद करुन टाकतो.”

“बस्स, एवढंच!”

“हो, तेवढं पुरेसं असतं.” व्यापारी म्हणाला.

“ही तर फारच गंमतशीर गोष्ट आहे.” राजकुमाराच्या मनात आलं. “...तशी काव्यमयही आहे जराशी. पण महत्वाची मात्रा अजिबातच नाही.”

महत्वाच्या गोष्टीबद्दल राजकुमाराच्या कल्पना वयानं वाढलेल्या माणसांपेक्षा खूपच वेगळ्या होत्या. त्याबद्दल तो व्यापाऱ्याला सांगू लागला :

“माझं स्वतःचं असं एक फूल आहे. त्याला मी रोज पाणी घालतो. माझे तीन ज्वालामुखी आहेत. दर आठवडयाला त्यांना मी स्वच्छ करतो. म्हणजे माझ्या मालक असण्याचा माझ्या फुलाला काहीतरी उपयोग होतो, ज्वालामुखींना उपयोग होतो. तुम्ही स्वतःला तुमच्या ताऱ्यांचा मालक म्हणवून घेता, पण त्यांच्या लेखी तर तुम्ही अगदीच कुचकामी दिसता!”

ह्यावर आता काहीतरी उत्तर द्यायलाच हवं म्हणून व्यापाऱ्यानं तोंड उघडलं खरं, पण उत्तर देण्यासारखं त्याला काही सुचेचना. मग काही राजकुमार तिथे थांबला नाही. फक्त मनाशी म्हणाला, “ही मोठी माणसं म्हणजे महाविक्षिप्त!” आणि पुन्हा प्रवास सुरु झाला.

## 14

पाचवा ग्रह तर फारच विलक्षण होता. सगळ्या ग्रहांमधे तो सर्वांत लहान होता. फक्त एक रस्तयावरच्या दिव्यचा खांब, आणि तो दिवा लावणारा एक माणूस. एवढ्या दोन गोष्टी मावतील इतकीच जागा त्या ग्रहावर जेमतेम होती. ह्या भल्याथोरल्या आकाशात, त्या छोट्याशा ग्रहावर, जिथे एकही घर नाही की गाव नाही, असल्या त्या जागी, त्या खांबावरच्या दिव्याचा आणि त्या दिवेवाल्याचा काय उपयोग असावा हे काही राजकुमाराच्या ध्यानात येईना. तरीपण तो स्वतःशी म्हणाला :



“हा माणूस कदाचित थोडा हास्यास्पद असेलही. तरीपण तो त्या राजापेक्षा, त्या स्तुतिप्रिय माणसापेक्षा, त्या दारुडयापेक्षा आणि त्या व्यापाऱ्यापेक्षा नक्कीच कमी विनोदी आहे. निदान तयाच्या कामाला काहीतरी अर्थ आहे. हा जेव्हा दिवा लावतो, तेव्हा जणू एखाद्या फुलालाच नवा जन्म लाभत असतो! आणि तो जेव्हा दिवा मालवतो, तेव्हा तो तारा मावळून जातो... ते फूल जणू झोपी जातं... किती छान उद्योग आहे हा! उपयुक्तही आहे, म्हणूनच तो छान आहे... सुंदर आहे.”

ग्रहावर उतरल्याबरोबर राजपुत्रानं दिवा लावणाऱ्याला मोठ्या आदरानं अभिवादन केलं आणि तो म्हणाला :

“नमस्ते. तू आत्ताच तुझा दिवा का मालवलास?”

“ते माझं नेमून दिलेलं काम आहे. तशी मला आज्ञा आहे.”

“नेमून दिललं काम म्हणजे काय? काय आज्ञा आहे तुला?”

“आज्ञा अशी आहे की मी माझा दिवा मालवून टाकवा. अच्छा. शुभरात्री.”

असं म्हणताम्हणताच त्यानं पुन्हा दिवा प्रकाशित केला.

“अरे अरे... पण.. मग लगेचच आत्ता पुन्हा तू तो दिवा प्रकाशित का केलास?”

“तेही माझं नेमून दिलेलंच काम आहे.”

“मला काहीच कळत नाहीय.”

“त्यात न कळण्यासारखं काही नाही. नेमलेलं काम म्हणजे नेमललं काम. सुप्रभातम्!” असं म्हणत त्यानं पुन्हा दिवा मालवला. आणि एक लाल चौकडीच्या रुमालनं कपाळवरला घाम पुशीत तो म्हणाला :

“माझा हा व्यवसाय म्हणजे एक भयंकरच काम होऊन बसलंय बाबा. पूर्वी जरा तरी बरं होतं मी सकाळी दिवा मालवायचो आणि संध्याकाळी लावायचो. नंतर दिवसभर मला विश्रांती घेता येई, रात्री सुखानं झोपता येई.”

“मग काय?... नंतर तुझं ते नेमलेलं काम बदललं का?”

“कामात काही बदल झाला नाही ना, आणि त्यामुळेच तर खरा घोटाळा झालाय. हा ग्रह दरवर्षी जास्तीजास्तीच वेगानं स्वतःभोवती गिरक्या घेऊ लागला आहे. आणि मला नेमून दिलेल्या आज्ञांमधे मात्र काहीसुद्धा बदल नाही.”

“मग?” राजकुमारानं विचारलं.

“मग? आता तर तो फक्त एका मिनिटात स्वतःभोवती फिरतो. दर मिनिटाला दिवस उजाडतो आणि दर मिनिटाला रात्र पडते. सेकंदाचीही फुरसद मिळत नाही मला. दर मिनिटाला मी दिवा लावतो आणि दर मिनिटाला मालवतो.”

“हे तर फारच विनोदी दिसतंय! या इथे, जिथे तू राहतोस तिथे, दिवस फक्त एका मिनिटात संपून जातो!”

“विनादीबिनोदी काही नाही हं महाराज...” दिवेवाला म्हणाला. “आत्ता आपण या गप्पा मारतोय ना, त्यात तब्बल एक महिना उलटून गेलेला आहे बरं...”

“एक महिना?”

“होय. तीस मिनिटं... महणजेच तीस दिवस! अच्छा, शुभरात्री.” असं म्हणून त्यानं दिवा मालवला.

राजकुमार त्याच्याकडे पाहातच राहिला आणि त्याला मनातल्या मनात हेसुद्धा कळलं की आपल्या कामाशी इमान राखणारा हा माणूस आपल्याला खूप आवडला आहे. त्याला आपले पूर्वीचे दिवस आठवलं. त्या वेळेस त्याला त्याचा आवडता सूर्यास्त पाहण्यासाठी आपली खुर्ची फक्त जराशी सरकवायला लागायची. ह्या आपल्या मित्रालाही थोडी मदत करावी असं त्याला वाटलं.
तो म्हणाला :

“तुझा ग्रह इतका लहान आहे की तीन पावलांत तू त्याच्यावर फेरी मारु शकतोस. जरा सावकाश चालत राहिलास तर तुला कायम सूर्यप्रकाशात राहता येईल आणि हवी तेव्हा कामापासून सुट्टी मिळेल. तुला फक्त नुसतं चालत रहावं लागेल. तुला हवा तेवढा वेळ तुझां दिवस टिकून राहील.”

“नुसता दिवसर टिकून राहण्याचा मला काय उपयोग?” तो म्हणाला.

“आयुष्यात मला जर काही करावंसं वाटत असेल तर ते म्हणजे झोपी जाणं.”

“मग मात्र तू फारच दुर्दैवी दिसतोस.” राजपुत्र म्हणाला. “यातून काही तुझी सुटका दिसत नाही.”

“हं, काहीच सुटका नाही यातून. सुप्रभात.” असं खेदानं म्हणत त्यानंदिवा मालवून टाकला.

पुढच्या प्रवासाला निघताना राजकुमाराच्या मनात आलं, “या माणसाकडे सगळेजग, म्हणजे तो

राजा, तो ज्ञानी, तो स्तुतिप्रिय, तो दारुडया, तो व्यापारी – सगळेच्या सगळे मोठ्या तुच्छतेनंच पाहतील. तरी मला मात्र तो त्यांच्या तुलनेनं बिलकुल तुच्छ वाटत नाही. कदाचित फक्त स्वतःतच गुंतून न राहता तो आपल्या बाजूच्या इतरही काही गोष्टींमधे रस घेतो... म्हणूनही तसं असेल." एक उसासा टाकून पुन्हा तो स्वतःशीच म्हणाला :

"त्या सर्वांमधे फक्त याच्याशीच माझी मैत्री जुळू शकली असती. पण त्याचा ग्रह फारच लहान आहे. इथे दोघांसाठी जागाच नाहीये ना..."

खरं म्हणजे त्याला इथून निघताना वाईट वाटण्याचं आणखीही कारण होतंच... की ज्या ग्रहावर चोवीस तासांत एक हजार चारशेचाळीस वेळा सूर्य मावळतो, अशा ग्रहाला आपण सोडून जातो आहोत... (पण हे त्याला स्वतःशी कबूल मात्र करायचं नव्हतं!)

## 15

सहावा ग्रह मात्र त्या छोट्या ग्रहाच्या दहापट मोठा होता आणि त्यावर एक म्हातारबुवा राहात होता. म्हातारबुवांचं एक जाडजूड पुस्तकात काहीतरी लिहिणं सुरु होतं.



"अरे वा! हा एक संशोधक आलेला दिसतोय!" राजकुमारकडे पाहात म्हातारबुवा स्वतःशीच म्हणाले.

"कुठून येता आहेस तू?" वृद्धानं त्याला विचारलं.

"एवढं जाडजूड पुस्तक कशाचं आहे?" तुम्ही इथे काय करता आहात? राजकुमारानं उलट त्यालाच विचारलं.

"मी एक भूगोलतज्ज्ञ आहे."

"भूगोलतज्ज्ञ म्हणजे काय?"

"तो एक मोठा विद्वान असतो. त्याला सगळे समुद्र, नद्या, डोंगर, शहरं, वाळवंट – सगळ्यांची नेमी सीनं माहित असतात."

"अरे वा! फारच छान!" राजकुमार म्हणाला. पुन्हा मग तो स्वतःशीच म्हणाला, "शेवटी हाच एक खरंखुरं काम असलेला माणूस दिसतोय."

नंतर त्यानं त्या ग्रहावर इकडे–तिकडे नजर फिरवली. आजपर्यनत त्यानं एवढा भव्य आणि विशाल ग्रह कधी पाहिला नव्हता. तो म्हणाला, ""हा तुमचा ग्रह काय सुंदर आहे! ह्यावर एखादा समुद्र आहे का हो? "

“त्याविषयी मी काही सांगू शकत नाही.” तज्ज्ञ म्हणाला.

“आणि शहरं, नद्या? वाळवंटं.. ”

“तेही मी काहीच सांगू शकत नाही.”

“अहो पण तुम्ही तर भूगोलतज्ज्ञ आहात नं?”

“अगदी बरोबर.” वृद्ध म्हणाला. “पण मी काही संशोधक नाहीये. या इथे संशोधकांची फार कमतरता भासते. भूगोलतज्ज्ञ स्वतः तर काही शहरं, नद्या, डोंगर, समुद्र, वाळवंटं यांचं मोजमाप करीत उगाच वणवण करीत नाही. आणि त्याला भटकत बसायला सवड तरी कशी मिळणार? तो फारत महत्वाचा माणूस असतो. तो आपली अभ्यासिका कधीच सोडत नाही. उलट तो असल्या भटक्या संशोधकांना आपल्याकडे बोलावून घेतो. मग तो त्यांना प्रश्न विचारतो आणि त्यांनी केलेल्या प्रवासाबद्दल ते जे सांगतात, त्या माहितीच्या आधारावर ते आपली टिपणं काढतो. त्यातली एखादी माहिती त्याला खरी वाटली तर तो त्या संशोधकाच्या चरित्र्याची चौकशी करण्याची आज्ञा करतो.”

“चरित्र्याची चौकशी?”

“कारण तो संशोधक जर खोटी माहिती सांगत असेल, तर त्याच्या माहितीच्या आधारावर भूगोलसंशोधक जो ग्रंथ लिहिणार त्यात भयंकर घोटाला होऊ शकतो ना! शिवाय एखादा संशोधक जर दारुडया अससेल तरीही तसाच घोटाला होऊ शकतो.”

“तो का?”

“कारण दारुडयाला सगळंच डबल-डबल दिसत असतं. म्हणजे खरोखर जर कुठे एक डोंगर पाहिलेला असेल तर दारुडयाला ते दोन दिसणार आणि भूगोलसंशोधकही मग तसंच लिहिणार.”

“मलाही एक दारुडया ठाऊक आहे बरं का.” राजकुमार म्हणाला. “तो पण मग असाच वाईट संशोधक होईल?”

“तीच तर शक्यता असते आणि म्हणूनच तर एखाद्या संशोधकाचं चारित्र्य चांगलं आहे असं समजल्यानंतरच त्यानं केलेल्या संशोधनाची आम्ही दखल घेतो.”

“चारित्र्य जे म्हणता ते तुम्ही प्रत्यक्ष पहायला जाता का?”

“नाही. ते प्रकरण फारच गुंतागुंतीचं आणि त्रासदायक असतं. मग आम्ही काय करतो की त्या त्या संशोधकानं आपल्या संशोधनाबाबत पुरावा सादर करावा यावर भर देतो. उदाहरणार्थ, समजा त्यानं एका मोठ्या पर्वताचा शोध लावला असेल, तर पुराव्या प्रीत्यर्थ त्यानं तेथून येताना प्रचंड शिळा आणायला हव्यात.”

भूगोलतज्ज्ञ आता भलताच उत्साहात आला.

“आणि तू... तूही फार लांबून येतो आहेस. चल, कर बरं तू आपल्या ग्रहाचं वर्णन.”

त्यानं आपलं ते जाडजूड रजिस्टर पुढे ओढलं आणि आधी पेन्सिलीला नीट टोक करून घेतलं.

“संशोधकानं केलेलं वर्णन आधी पेन्सिलीनं लिहून घ्यावं लागतं. त्यानं नीट पुरावा सादर केल्यानंतर मग ते शाईनें लिहायचं असतं आणि त्यासाठी काही काळ थांबायची गरज असते... हं, तर मग सांगतो आहेस नं?” भूगोलतज्ज्ञानं राजकुमाराला मोठ्या अपेक्षेनं विचारलं.

“अहो, पण माझा तिथं तसं काही फारसं मजेदार नाहीये.” राजकुमार म्हणाला. “माझा ग्रह इतना लहानं आहे! थ्तथे तीन ज्वालामुखी आहेत. दोन जागृत आणि एक निद्रिस्त. पण त्याचाही काही नेम नाही.”

“हे, त्याचा काय नेम...” तज्ज्ञ पण तेच म्हणाला.

“माझ्याकडे एक फूलही आहे.”

“आम्ही फुलांची नोंद करीत नसतो.” भूगोलतज्ज्ञ म्हणाले.

“ते का? माझ्या ग्रहावरची सर्वांत जर काही सुंदर गोष्ट असेल, तर ती म्हणजे ते फूल आहे.”

“आम्ही फुलांना मोजन नाही. कारण फुलांच आयुष्य क्षणभंगूर असतं.”

“क्षणभंगूर? क्षणभंगूर म्हणजे काय?”

“हे पाहा भूगोलचे ग्रंथ. हे निश्चित अशा अनुमानांनी सिद्ध झालेले अत्यंत महत्वपूर्ण आणि इतर सर्व ग्रंथामधे श्रेष्ठ असे ग्रंथ असतात. ते कधीही कालबाह्य ठरत नाहीत. पर्वत हे क्वचितच आपली जागा बदलतात. समुद्र आटणं ही गोष्टही क्वचितच संभवते आणि आम्ही चिरकाल टिकणाऱ्या गोष्टीबाबतच लेखन करतो.”

“पण निद्रिस्त ज्वालामुखी पुन्हा जागृत होऊ शकतात, नाही का?...मग क्षणभंगूर म्हणजे तरी काय?” राजकुमारनं मधेच विचारलं.

“ज्वालामुखी निद्रिस्त असोत व जागृत. आमच्या लेखी या दोन्ही गोष्टी समानच.” तो भूगोलतज्ज्ञ म्हणाला. “आम्हाला फक्त पर्वतांशी कर्तव्य असतं. आणि ते काही जागा बदलत नसतात.”

“पण तरी.. क्षणभंगूर म्हणजे काय असतं?” विचारलेल्या प्रश्न पिच्छा राजकुमारानं आयुष्यात कधी सोडून दिला आहे!

“क्षणभंगूर म्हणजे जे लवकर नाहीसं होणार असतं, ते.”

“माझ्या फुलाला लवकर नाहीसं होण्याचा धोका आहे का?”

“अर्थात आहेच.”

“माझं फूल... माझी फुलराणी... क्षणभंगूर आहे!” तो स्वतःशीच म्हणाला. ‘ह्या जगापासून स्वतःचं संरक्षण करायला तिच्याजवळ फक्त चार काटे आहेत. आणि मी...? मी तिला माझ्या ग्रहावर एकटीला सोडून आलो आहे...’

राजपुत्राला पश्चाताप वाटण्याचा हा पहिला क्षण होता.

तरीही त्यानं धैर्य गोळा करून म्हटलं, “आता मी कोणत्या ग्रहाला भेट द्यावी, याबावत आपला काय सल्ला असेले?”


“पृथ्वी नामक ग्रहावर जा. त्याची ख्याती चांगली आहे.” भूगोलतज्ज्ञानं उत्तर दिलं.

...आपल्या फुलराणीची मनातल्या मनात आठवण काढीत राजकुमार पुढच्या प्रवासाला निघाला.

## 16

तेव्हा आता त्याला सातव्या ग्रहावर म्हणजे पृथ्वीवर प्रयाण करायचं होतं. पृथ्वी म्हणजे काही असातसा सामान्य ग्रह नाही! इथे एकूण एकशे अकरा राजे आहेत. (अर्थात त्यात निग्रो राजेही आले.) साडेसात हजार भूगोलतज्ज्ञ आहेत, नऊ लाख व्यापारी आहेत, पंचाहत्तर लाख दारुडे आहेत, आणि एकतीस कोटी अकरा लाख स्तुतिप्रिय माणसं आहेत. म्हणजेच जवळजवळ दोन अब्ज कोटी माणसं ही वडीलधारी म्हणजेच मोठी माणसं आहेत.

पृथ्वीच्या विस्तारची तुम्हाला कल्पना यावी म्हणून सांगताय की विजेचा शोध लागण्यापूर्वी आपल्या खंडावर मिळून चार लाख बासष्ट हजार पाचशे अकरा रस्त्यांवर दिवे लावणाऱ्या मंडळींची सेना राबत असायची. थोडं दुरून पाहिलं तर हे दृश्य फारच चित्तवेधक दिसत असे. दिवे लावणाऱ्यांच्या या



हालचाली म्हणजे नृत्यनाटिकेमधल्या कलाकारांसारख्या तालबद्ध असत. पहिल्या प्रथम ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड ह्या खंडाची पाळी येई, आपले दिवे लावून झाले की ही मंडळी झोपत. मग चीन व सैबेरियात दिवे लावणारे रंगमंचावर प्रवेश करीत. ते पडद्याआड गेल्यावर रशियात व भारतात दिवे लावणारे हाजिर होत. त्यांच्या पाठोपाठ दक्षिण अमेरिकेतले आणि जरा नंतर उत्तर अमेरिकेतले दिवे लावणारे पुढे येत. आपला क्रम कुणीदेखील चुकवीत नसे. हे दृश्य फारच बहारीचे दिसे.

फक्त उत्तर ध्रुवावरचा एकुलता एक दिवा लावणारा आणि त्याच्यासारखाच दक्षिण ध्रुवावरचा एकुलता एक दिवा लावणारा, या दोघांच्या वाट्याला मात्र फारसे कष्ट नव्हते, आरामच जास्त, कारण तिथे सहा महिन्यांची रात्र आणि सहा महिन्यांचा दिवस, म्हणजे वर्षातून काम असं फक्त दोनदाच करायला लागायचं!

## 17

तुम्हाला एखादी गोष्ट जेव्हा रंगवून सांगायची असते ना, तेव्हा तुम्ही थोडंसं खोटं बोलता. आत्ता मी तुम्हाला दिवे लावणाऱ्यांची गोष्ट सांगितली, तेव्हा मीही थोडी अतिश्योक्तीच केली! त्यामुळे ज्यांना आपल्या पृथ्वीग्रहाची माहिती नाही त्यांची जरा दिशाभूल होऊ शकते. खरं तर माणसांना जमिनीच्या पृष्टभागावरची फारच थोडी जागा लागते. जर समजा, पृथ्वीवरची दोन अब्ज माणसं एखाद्या सभेला जमावं तशी दाटीवाटीनं, एकमेकांना अगदी चिकटून-चिकटून उभी राहिली, तर ती एकूण वीस मैल रुंद एवढ्या मैदानात अगदी सहज मावून जातील. सारीच्या सारी मानवजात पॅसिफिक महासागरातल्या एखाद्या छोट्याशा बेटावर सहज सामावून जाऊ शकते.

मोठी माणसे अर्थातच ह्याच्यावर विश्वास ठेवणार नाहीत. आपल्याला खूप मोठ्या जागेची आवश्यकता असते अशी त्यांना वाटत असतं. तुम्ही त्यांना स्वतःचे हिशोबबिशोब करायला सुचवून बघा, की ही मंडळी एकदम खूष. ह्या मोठ्या माणसांना आकडयांचं फार आकर्षण असतं. तुम्ही मात्र ह्या नसत्या खटाटोपात व्यर्थ वेळ घालवू नका. मी तुम्हाला खरं तेच सांगतोय.

आणि म्हणूनच, जेव्हा छोटा राजकुमार पृथ्वीवर आला तेव्हा त्याच्या दृष्टिला एकही माणूस न दिसल्यानं त्याला प्रचंड आश्चर्य वाटलं. आपण चुकीच्या ग्रहावर तर आलो नाही ना अशीश शंकाही त्याला आली, तेवढ्यात त्या रुपेरी चंद्रप्रकाशात... वाळूच्या पलिकडे... त्याला एक सोनेरी वेटोळं दिसलं.

“शुभरात्री” राजकुमारानं सहजच म्हटलं.

“शुभरात्री” साप म्हणाला.

“मी कोणत्या ग्रहावर उतरलोय?”

“पृथ्वीवर, आफ्रीकेत.”

“अच्छा! म्हणजे मग पृथ्वीवर अजिबात माणसं नाहीत का?”

“हे वाळवंट आहे. वाळवंटात माणसं नसतात. पण पृथ्वी खूप विशाल आहे.”

राजकुमार तिथल्याच एका खडावर बसला. त्यानं मान वर करुन आपली नजर आकाशाकडे वळवली.

“मला नेहमी प्रश्न पडतो की प्रत्येकाला, कधी न कधी आपला तारा ओळखता यावा, आपल्या ताऱ्याची ओळख पटावी म्हणूनच हे सगळे तारे असे लुकलुकत असतील का? तो पहा माझा ग्रह, बरोब्बर अगदी आपल्या माथ्यावर आहे... पण तरीही किती दूर आहे तो...!”

“वाः! सुंदरच आहे तो तारा.” साप म्हणाला. “पण तू इथे कशासाठी आला आहेस?”

“...माझं एक फुलराणीशी जरा बिनसलं होतं...” राजकुमार म्हणाला.

“अस्सं!”

दोघेही जरावेळ काहीच बोलले नाहीत.

“पण इथली माणसं कुठे आहेत?” राजकुमारानं पुन्हा संभाषण सुरु केलं. वाळवंटात म्हणजे जरा एकटंएकटंच वाटतं नाही?”

“माणसांमधे तरी काय... एकटंच तर वाटतं आपल्याला... एकाकीच असतो आपण तसे.” साप म्हणाला.

कितीतरी वेळ राजकुमार सापाकडे पाहात होता. शेवटी तो म्हणाला, “मजेशीरच प्राणी दिसतोयस तू... बोटाएवढाही जाड नाहीयेस.”

“पण माझी ताकद मात्र राजाच्याही बोटापेक्षा जास्त आहे बरं का!”

हे ऐकून राजकुमाराला हसूच आलं. तो म्हणाला, “अरे, तू काही फार ताकदवान दिसत नाहीयेस. पायसुद्धा नाहीत तुला. प्रवासही करू शकत नसशील तू.”

“मी तुला एखादी बोट जेवढं लांब नेईल, त्यापेक्षासुद्धा जास्त दूर नेऊ शकतो.” असं म्हणून सापानं राजकुमाराच्या घोट्याभोवती विळखा घातला... जणू काही पायातला सोन्याचा तोडाच! “मी जया कुणाला स्पर्श करतो, त्याला या पृथ्वीवरुन ताबडतोब पाठवून देतो, तो जिथून आला असेल तिथे...!” पण तू निष्पाप दिसतो आहेस. खरेपणानं वागणारा वाटतोस... आणि शिवाय तू एका ताऱ्यावरुन आला आहेस...”

राजकुमार फक्त शांतपणे ऐकत होता. सापाच पुढे म्हणाला, “ह्या पाषाणांनी बनलेल्या पृथ्वीवर एवढास जीव तू... तुझी काळजी वाटते. जर तुला कधी तुझ्या त्या ग्रहाची फारच आठवण यायला लागली ना, तर मी तुला मदत करू शकेन... मी...”

“अं..? हो! म्ला बरोबर समजलंय तू काय म्हणतो आहेस ते...” राजकुमार म्हणाला. “पण तू सारखा असा कोडयात का रे बोलतोस?”

“कारण मी सगळी कोडी सोडवताही.” साप म्हणाला.

यावर मग दोघेही काहीच बोलले नाहीत.

## 18

छोटा राजकुमार वाळवंट ओलांडून जरा दूर गेला तर त्याची फक्त एका फुलाशी भेट झाली. ते एक तीन पाकळयांचं फूल होतं, कुणाचंही फारसं लक्ष वेधणार नाही असं. साधंसुधं.

“सुप्रभात!” राजकुमार म्हणाला.

“सुप्रभात!”

“इथं माणसं कुठं भेटतील बरं?” राजकुमारानं अदबीनं विचारलं.


पूर्वी कधीतरी एकदा फुलानं माणसांचा काफिला त्या बाजूनं जाताना पाहिला होता. ते म्हणालं, “माणसं? हो, असतील ना. मला वाटतं, सहा किंवा सात असावीत. खूप वर्षांपूर्वी पाहिलं होतं मी त्यानां. पण आता ती कुठे सापडतील कुणास ठाऊक! वारा वाहील तिकडे ती भरकटत असतात. कसलीच पाळंमुळं नसतात त्यांना आणि त्यामुळेच बिचाऱ्यांचं आयुष्य अगदी अवघड होऊन जातं.”

“ठीक आहे मग, निघतो मी आता. नमस्ते!” असं म्हणून राजकुमारानं निरोप घेतला.

“बरंय.” फूल म्हणालं.

## 19

त्यानंतर छोटा राजकुमार डोंगराच्या एका खूप उंच सुळक्यावर चढून गेला. आतापर्यन्त त्याला जेमतेम त्याच्या गुडघ्यापर्यनत येणारे तीन ज्वालामुखीच काय ते माहीत होते. निद्रिस्त ज्वालामुखीचा तर तो एखाद्या स्टुलासारखाच उपयोग करायचा.



“एवढ्या उंचावरुन मला एकाच वेळी संपूर्ण ग्रह आणि त्याच्यावरची सगळी माणसं पाहता येतील” तो स्वतःशीच म्हणत होता. पण प्रत्यक्ष तिथे पोचल्यावर मात्र सुईसारख्या निमुळत्या होत गेलेल्या आजूबाजूच्या इतर तरीही तो म्हणालाच, “नमस्ते.”

“नमस्ते... नमस्ते ... नमस्ते,” प्रतिध्वनींतून उत्तर आलं.

“तुम्ही कोण?” त्यानं विचारलं.

“तुम्ही कोण?” तुम्ही कोण? तुम्ही कोण?”

“तुम्ही माझे मित्र व्हा... अगदी एकटा आहे मी...”

“एकटा आहे मी... एकटा आहे मी...एकटा आहे मी...” प्रतिध्वनींमधून प्रतिसाद आला.

त्याला वाटलं, “काय विचित्र ग्रह आहे हा! अगदीच रुक्ष. सुळक्या-सुळक्या, कठोर आणि ओसाड! इथल्या माणसांमधेही काही कल्पकता दिसत नाही. आपण जे त्यांच्याशी बोलतो तेच ते पुन्हा आपल्याशी बोलत राहतात... माझ्या ग्रहावरची माझी फुलराणी... ती कशी नेहमी आपण होऊन नवंनवं छानछान बोलत असायची...”

## २०

बराच वेळ वाळू, खडक, आणि बर्फातून चालल्यानंतर अखेर छोट्या राजकुमाराला एक रस्ता सापडला. शेवटी सगळे रस्ते हे मनुष्यवस्तीकडेच जाणारे असतात.

“सुप्रभात!” तो म्हणाला.

प्रफुल्ल अशा गुलाबपुष्पांनी बहरलेल्या बागेसमोर तो आत्ता उभा होता.

“सुप्रभात!” फुलं म्हणाली.

राजकुमारानं टक लावून त्यांच्याकडे पाहिलं ...आणि आश्चर्य म्हणजे ती सगळीच्या सगळी त्याच्या त्या फुलराणीसारखीच दिसत होती! राजकुमारानं चकित होऊन विचारलंः

“कोण आहात तुम्ही?”

“आम्ही? आम्ही गुलाबाची फुलं!” ती म्हणाली.

“हं!” म्हणत तो इतका खिन्न होऊन गेला...कारण त्याच्या फुलराणीनं तर त्याला सांगितलं होतं की अख्ख्या जगात तिच्यासारखी म्हणजे फक्त ती एकटीच होती, आगळी वेगळी!... आणि इथे पाहतोय तर... तिच्याचसारखी चांगली पाच हजार फुलं त्या एकाच बागेत फुललेली डोळ्यांना दिसत होती...!

‘हे दृश्य जर फुलराणीनं पाहिलं तर... स्वतःला फार त्रास करुन घेईल ती...जोरानं खोकेल... आपली फजिती लपवण्यासाठी प्राण जातोयसं भासवेल... मग मला सेवाशुश्रूषा करण्याचं नाटक करावं लागेल... कारण मी जर तसं केलं नाही...तर मला अपराधी वाटावं म्हणून... कदाचित ... कदाचित ती पटकन् मरुनसुद्धा जाईल...’

जराशानं पुन्हा त्याच्या मनात आलं : ‘मला वाटत होतं, किती भाग्यवान आहे मी! ज्गात एकमेवाद्वितीय अशी फुलराणी... ती माझी आहे...पणती तर अगदीच सामान्य दिसतेय...आणि माझे ते तीन ज्वालामुखीही! जेमतेम माझ्या गुडघ्यापर्यंत पोचणार... त्यातून तो एक तर...कायमचा निद्रिस्तच असतो...म्हणजे एकूण मी काही तसा फार थोर राजकुमार नाहीये तर...’

आणि खाली गवतात पडून तो सरळ हुंदके देऊ लागला.

## २१

नंतर तिथे एक कोल्हा आला.

“नमस्कार.” कोल्हा म्हणाला.


“नमस्कार.” राजकुमारानं अदबीनं म्हटलं आणि वळून इकडे तिकडे पाहिलं. पण त्याला कुणीच दिसलं नाही.

“मी इथे आहे...इकडे, या सफरचंदाच्या झाडाखाली.”

“कोण तू?” राजकुमारानं विचारलं. “किती छान दिसता आहेस!”

“मी कोल्हा आहे.” कोल्हा म्हणाला.

“माझ्याशी खेळायला ये ना मग...मी फार दुःखी झालो आहे.” राजकुमार म्हणाला.



"पण . . .मला तुझ्याशी तसं खेळताबिळता येणार नाही . कारण मी अजून तसा माणसाळलेला नाहीये ."

"बरं जाऊ दे मग . . ." राजकुमार म्हणाला . "पण माणसाळलेला म्हणजे काय रे ?"

"तू इथला नाहीस वाटतं ? मग इथे काय शोधायला आला आहेस ?"

"मला माणसं हवी आहेत ." राजकुमार म्हणाला . "पण सांग ना रे, माणसाळलेला म्हणजे काय ?"

"माणसं शोधतो आहेस तू ? अरे . . त्यांच्याजवळ बंदुकी असतात बंदुकी, आणि त्या बंदुकांनी ती शिकार करतात प्राण्यांची . तो मोठाच उपद्रव असतो . माणसं कोंबडयादेखील पाळतात . फक्त त्यांना हे असलंच काहीतरी आवडतं . तूही कोंबडया शोधतोयस की काय ?" कोल्ह्यानं विचारलं .

"नाही रे बाबा . मी . . . मित्र शोधतोय ." राजकुमार म्हणाला . "पण ते 'माणसाळलेलं म्हणजे काय असतं ?"

"ते आता लोक विसरूनच गेले आहेत . . .माणसांनी प्राण्यांना आपलं मानणं . . आणि प्राण्यांना माणसं आपली वाटणं . . .'आपलं मानणं ' म्हणजेच माणलाळवणं ." कोल्ह्यानं सांगितलं आणि तो पुढे म्हणाला, "आपलं मानणं म्हणजे कुणाला तरी जीव लावायचा . . . त्याच्याशी बंध जोडायचे . . ."

"बंध जोडायचे . . . ?"

"होय ." कोल्हा म्हणाला . "आता माझ्यासाठी तू म्हणजे काय, इतर लाख मुलांसारखाच आहेस, कुणीतरी . . . हो की नाही ? आणि . . . मीदेखील तुला तसाच लाखो कोल्ह्यांमधला आपला . . .कुठला तरी एक कोल्हा . . .वाटत असणार . मला तुझी जरूर नाही आणि तुलाही माझी गरज नाही . पण तू जरा मला 'आपलं' मानलंस, माणसाळवलंस, तर आपल्याला एकमेकांची गरज भासेल . मी तुझ्यासाठी कुणीतरी 'खास' असेन, आणि माझ्यासाठी तूदेखील 'अगदी खास . . .कुणीतरी विशेष' असा असशील ."

"हं . . हं! जराजरासं समजतंय बरं का मला तू काय म्हणतो आहेस ते ." राजकुमार म्हणाला . "बरं का . . .माझी एक फुलराणी आहे . मला वाटतं तिनं मला माणसाळवलंय, म्हणजे . . .मला आपलं मानलंय . . . कुणीतरी 'खास' मानलंय . . ."

"शक्य आहे ." कोल्हा म्हणाला . "ह्या पृथ्वीवर आपल्याला कितीतरी प्रकार पहायला मिळतात ."

"आं ? अरे हे मी सांगतोय ते काही पृथ्वीवरचं नाहीये . . ."

कोल्हा बुचकळ्यात पडला, आणि उत्सुकतेनं म्हणाला, “मग काय दुसऱ्या ग्रहावरचं ?”

“अर्थात्!” राजकुमार म्हणाला.

“तिथे शिकारी आहेत ?”

“नाहीत.”

“अरे...रे! बाकी सगळंच कसं आपल्या मनासारखं असणार म्हणा!”

मग त्यानं एक उसासा टाकला आणि पुन्हा तो मूळ गोष्टीवर आला.“इथे माझं आयुष्य जरा रटाळच आहे. मी कोंबडयांचा पाठलाग करतो ...माणसं माझा करतात. सगळ्या कोंबडया सारख्याच आणि सगळी माणसंही सारखीच. म्हणून मग मला इथे फार कंटाळा येतो. तू जर मला आपलं मानलंस ना, तर माझ्या जगण्याला खरंच काहीतरी अर्थ येईल... मला नवा आनंद मिळेल. इतक्या सगळ्या पावलांमधून मला त्या वेगळ्या पसवलांची वेगळीच चाहूल लागेल. इतर पावलांच्या चाहुलीनं मी जमिनीखाली लपून बसतो. तुझ्या पावलांच्या चाहुलीनं मी बाहेर पडेन. तो आवाज...मला संगीतचा मंजुळ स्वर भासेल ... ते पहा गव्हाचं शेत. मी पोळी खात नाही म्हणून मला त्या गव्हात काहीच रस नसतो. कशात रस नसणं हीदेखील खेदाचीच गोष्ट असते. तू सोनेरी केसांचा मुलगा आहेस, तू जर मला आपलं मानलंस ना की एक विलक्षण गोष्ट होऊन जाईल रे! ही एवढी गव्हाची शेतं आहेत ना? पण मी थोडीच पोळी खाणार? मग काय बरं उपयोग मला या गव्हाच्या शेतांचा?...पण आता... ही सोनेरी कणसं पाहिली की आता मला तुझी आठवण येईल?.. आणि त्या शेतातून वाहणाऱ्या वाऱ्याची सळसळ ऐकून मी अगदी खू[illegible] होऊन जाईन ...” नंतर बराच वेळ टक लावून त्यानं राजकुमारकडे पाहिलं. आणि मग हसून म्हणाला, “प्लीज, मला आपलं मान न!”

“ओहो! मलाही ते आवडेलच.” राजकुमार म्हणाला. “पण मला फार सवड नाहीये रे. मला आणखी मित्र शोधायचेत आणि खूप काही समजून घ्यायचंय.”

“आपण ज्यांना आपलं मानता ना तेवढयाच गोष्टी आपल्याला समजू शकतात.” कोल्हा म्हणाला. “माणसांना मुळी काहीही समजून घ्यायला वेळच नसतो. ते नेहमीच बाजारातल्या तयार वस्तू विकत घेत असतात. पण या जगाच्या पाठीवर मैत्री विकणांर एकही दुकान नाहीये. अर्थातच माणसांना मित्र असा मग मिळतच नाही कुणी. तुला जर मित्र हवा असेल, तर तम मला आपला मान, मला माणसाळव.”

“माणसाळवायचं म्हणजे काय करायचं असतं?”

“त्यासाठी अगदी सगळं काही शांतपणे करायला हवं असतं.” कोल्हा म्हणाला. “म्हणजे काय... की आधी तू गवतात, माझ्यापासून जरा लांब बसायचंस. मग मी असा.. डोळ्यांच्या कोपऱ्यातूल तुला न्याहाळीन, आणि तू मात्र तेव्हा काहीही बोलणार नाहीस. अरे या भाषेमुळेच तर काहीवेळा केवढाले अनर्थ घडून येतात. नंतर मग हळूहळू रोज तू माझ्या आणखी... आणखी जवळ येत जाशील.”

दुसऱ्या दिवशी राजकुमार पुन्हा त्या जागी आला.

“अरे! आत्ताच आलास? तू आपल्या कालच्याच वेळी आला असतास ना, तर आणखी छान झालं असतं रे.” कोल्हा म्हणाला. “म्हणजे बघ... की तू दुपारी चार वाजता येणार आहेस. तर मी तीन वाजल्यापासूनच अगदी खुषीत यायला लागेन. तुझ्या येण्याची वेळ जशीजशी जवळ येत जाईल तसतशी माझी उत्कंठा वाढत जाईल. आणि चार वाजता तर ती अगदी शिगेला पोचेल...मला इतर काही-काही सुचेनासं होईल. आणि शेवटी तर तू येतो आहेस की नाही... अशी मी काळजी करायला लागेन! मधेच, तू येणारच नाहीस अशी भीतीही वाटेल मला. त्यामुळेच... मला त्या सुखाच्या क्षणाची किंमत कळेल! पण तू जर वाट्टेल तेव्हा येशील, तर माझ्या हृदयानं तुझ्या स्वागतासाठी उत्सुक कधी नि कसं व्हायचं ते मला कसं समजणार? माझी उत्कंठा वाढत कशी जाणार? म्हणून तर या बाबतीतल्या योग्य त्या प्रथा पाळायच्याच असतात.”

"प्रथा म्हणजे काय?" राजकुमारानं विचारलं.

"प्रथादेखील आता लोक विसरतच चाललेत." कोल्हा म्हणाला. "प्रथांमुळेच आपला एक दिवस दुसऱ्या दिवसांपेक्षा वेगळा होत असतो... एक तास, इतर तासांपेक्षा वेगळा भासतो. उदाहरणार्थ, इथल्या शिकाऱ्यांमधे एक प्रथा आहे. दर गुरुवारी ते खेडयातल्या मुलींबरोबर नाचायला जातात, त्यामुळे गुरुवार हा माझ्यासाठी भलताच मजेचा दिवस असतो. त्या दिवशी मी थेट त्या द्राक्षांच्या मळ्यापर्यनत फिरायला जातो! जर ते शिकारी कोणत्याही दिवशी नाचायला जाऊ लागले, तर मला सगळे दिवस सारखेच वाटतील, आणि सुट्टीचा आनंद मुळी मिळणारच नाही..."

आणि मग त्या राजकुमारानं कोल्ह्याशी गट्टी करुनच टाकली. मात्र जेव्हा राजकुमाराची परतण्याची वेळ जवळ आली... तेव्हा कोल्हा म्हणाला, "छे !.. आता रडू येणार मला..."

"यात चूक तुझीच आहे बरं का," राजकुमार म्हणाला. "तुझ्या मनाला त्रास व्हावा असं मला जराही वाटत नव्हतं रे...पण मी तुला आपलंसं करावं असं तुलाच वाटत होतं, हो किनई?"

"बरोबर आहे तुझं." कोल्हा म्हणाला.

"मग तरीही तू आता रडणार आहेस...?"

"हो...रडू तर येणारच..."

"आपलीतुपली दोस्ती झाली हे छान नाही का झालं? काहीच उपयोग नाही त्याचा?"

"नाही कसा?" कोल्हा म्हणाला. जराशानं पुन्हा म्हणाला, "त्या गव्हाच शेतांचा तो सोनेरी रंग...ते गुलाब... ते बघून ये ना पुन्हा एकदा... म्हणजे आता तुला समजेल की तुझी फुलराणी सगळ्या जगात कशी वेगळीच आहे, खास आहे. नंतर माझा निरोप घेण्यासाठी तू पुन्हा माझ्याकडे ये. त्यावेळेस मी तुला एक गुपित सांगणार आहे, आणि हे गुपित... ही माझी तुझ्यासाठी खास भेट असणार आहे! "

कोल्ह्यानं असं सांगितल्यावर मग राजकुमार ते गुलाब पुन्हा एकदा बघण्यासाठी म्हणून गेला.

"माझ्या गुलाबराणीत आणि तुमच्यात...काहीसुद्धा साम्य नाहीये." तो त्यांना म्हणाला. "अद्याप कुणीच तुम्हाला आपलं म्हटलं नाहीये... आणि तुम्हीही कुणाला आपलंसं केलेलं नाही. मी पहिल्यांदा त्या कोल्ह्याला भेटलो तेव्हा तो जसा एकाकी होता, तशीच तुम्ही आत्तादेखील आहात. तोही मला आधी असाच इतर हजारो, लाखो कोल्ह्यांमधला एक वाटत होता. मी त्याला आपलं मित्र मानलं आणि आता तो अख्ख्या जगात.. एक खास आगळावेगळा असा कोल्हा झाला आहे."

हे ऐकल्यावर ती फुलं बिचारी अगदी हिरमुसून गेली.

"तुम्ही सुंदर आहात, पण पोकळच आहे तुमचं जीवन. आजवर कुणीच जीव ओवाळून टाकू शकला नाही तुमच्यासाठी." जराशानं पुढे तो म्हणाला, "अर्थात, एखाद्या सामान्य प्रवाशाच्या नजरेला... माझी फुलराणीही अगदी तुमच्यासारखीच वाटेल म्हणा. पण ती माझी फुलराणी आहे...! तिच्यासारखी फक्त तीच. तीच ती, जिला मी काचेच्या घुमटाखाली ठेवता, मी तिच्यासाठी निवारा केला आहे, कितीतरी परीनं जपलं आहे तिला! तिच्याचसाठी तर मी ते सगळे सुरवंट नाहीसे केले...(फक्त दोनतीन मात्र वाचवले... त्यांची फुलपाखरं व्हावीत म्हणून!) तिचं सगळंसगळं मी ऐकून घेतलं आहे, तिचा आक्रस्ताळेपणा, तिच्या बढाया... आणि कधीकधी ती मूक होऊन जायची ना?.. तेसुद्धा!... कारण... ती 'माझी गुलाबराणी ' आहे!"

आणि आता तो कोल्ह्याचा निरोप घेण्यासाठी कोल्ह्याकडे पुन्हा आला.

"बाय!" कोल्हा उत्तरला. "आता माझं गुपित ऐकून घे. तसं अगदी साधंच आहे. जेव्हा आपण आपल्या इच्छेनं...मनपासून जगाकडे पाहतो ना, तेव्हाच आपल्याला खरंखुरं दिसू शकतं. कारण जे खरं दिसायला हवं असतं, ते नुसत्या डोळ्यांना दिसूच शकत नाही... ते फक्त आपल्या अंतःकरणालाच दिसू शकतं!"

“जे खरं महत्वाचं असतं ते नुस्त्या डोळ्यांना दिसू शकत नाही.” नीट लक्षात रहावं म्हणून राजकुमारानं पुन्हा कोल्ह्याचेच शब्द उच्चारले.

“मी तिच्यासाठी क्षणक्षण वेचला आहे.” राजकुमारानं तेच शब्द उच्चारले, नीट लक्षात रहावं म्हणून.

“माणूस आता हे सत्य विसरून गेला आहे.” कोल्हा म्हणाला. “पण तू मात्र हे कधीही विसरायचं नाहीस. ज्याला आपलं मानलं आहे, त्याची जवाबदारी आपणच घ्यायला हवी. तुझ्या फुलराणीची जवाबदारी सर्वस्वी तुझ्यावर आहे.”

“माझ्या फुलराणीसाठी सर्वस्वी मी जवाबदार असेन.” याचा कधीही विसर पडायला नको यासाठी राजकुमारानं पुन्हा एकदा त्या शब्दांचा उच्चार केला.

## 22

“नमस्ते.” राजकुमार म्हणाला.

“नमस्ते.” रेल्वेच्या सिग्नलवाल्यानं प्रतिअभिवादन केलं.

“तू इथे काय काम करतो आहेस?”

“मी प्रवाशांचे हजारा–हजारांचे गट करतो आणि ते प्रवासी वाहून नेणाऱ्या आगगाडयांना एकदा डावीकडे पाठवतो तर एकदा उजवीकडे पाठवून देतो.”

तेवढ्यात सिग्नलवाल्याची केबीन हादरवून टाकरणारी एक झगमगणारी एक्सप्रेस गाडी विजेचा गडगडाट व्हावा तशी धाडधाड करीत तेथून गेली.

“भलतेच घाईत दिसतात हे लोक. काय शोधताहेत काय ते?”

“ते स्वतः इंजिन–ड्रायव्हरला तरी कुठे माहीत आहे!” सिग्नवाला म्हणाला.

तेवढ्यात झगमगणारी दुसरी एक्सप्रेस गाडी धाडधाड करीत विरुद्ध दिशेनं गेली.

“ही माणसं एवढ्यात परतलीसुद्धा?” राजकुमाराला फार आश्चर्य वाटलं.

“ही काही तीच माणसं नाहीयेत, ती बदली माणसं आहेत.”

“का बरं? ते जिथे गेले होते तिथे त्यांना आवडलं नाही वाटतं?”

“ते जिथे जातात तिथे कुणीच समाधानी होऊ शकत नाही.”

आणि तेव्ढ्यात तिसऱ्या झगमगणाऱ्या एक्सप्रेस गाडीची धाडधाड त्यांना ऐकायला आली.

“हे त्या पहिल्या गाडीतल्या प्रवाशांचा पाठलाग करीत आहेतकी काय?”

“ते कुणाचा पाठलाग करीत नाहीयेत. चक्क झोपा काढताहेत ते गाडीत, नाहीतर जांभ्या देत असतील. फक्त छोटी मुलंच काय ती खिडक्यांच्या काचांवर नाकं दाबून अगदी कुतूहलानं बाहेर पाहात असतात.”

“आपण नेमकं काय पाहयचं, कशाचा शोध घ्यायचा हे फक्त मुलांनाच कळत असतं.” राजपुत्र म्हणाला. “पहा ना, एका साध्या चिंधीच्या बाहुलीशी खेळण्यात ते वेल फुकट घालवतात असं वाटतं, पण ती बाहुली त्यांच्या लेखी इतकी महत्वाची असते की ती त्यांच्यापासून जर कुणी हिरावून घेतली तर... तर मुलं रडायला लागतात...”

“कुणासाठी तरी रडू येणं...! भाग्यवान असतात बेटी!” सिग्नलवाला म्हणाला.

## २३

“नमस्कार.” राजकुमार म्हणाला.

“नमस्कार.” व्यापाऱ्यानं उत्तर दिलं.

हा व्यापारी माणसांची तहान भागवणाऱ्या गोळ्यांची विक्री करीत होता. आठवड्याला फक्त ही एक गोळी गिळून टाकायची की मग काही पेय पिण्याची इच्छाच होत नाही.

“तू ह्या गोळ्या कशाला विकतो आहेस?” राजकुमारानं त्याला विचारलं.

“अरे त्यामुळे केवढा तरी वेळ वाचू शकतो.” व्यापारी म्हणाला.

“तज्ज्ञांनी त्याबद्दल अभ्यास करून निष्कर्ष काढून दिला आहे की या गोळ्यांमुळे प्रत्येक आठवड्याला आपली तब्बल त्रेपन्न मिनिटं वाचतात!”

“त्या वाचलेल्या त्रेपन्न मिनिटांचं काय करायचं?”

“काहीही करावं, आपल्याला काय हव्वं ते...”

“मला जर अशी त्रेपन्न मिनिटं मनासारखी घालवयला मिळाली ना, तर मी छानपैकी रमत गमत एखाद्या निर्मल झऱ्याच्याच दिशेनं चालत जाईन!”

## २४

त्या वळवंटात माझ्या विमानाला अपघात झाल्यापासूनचा तो आठवा दिवस होता. आणि माझ्याजवळ असलेल्या पाण्याचा अखेरचा थेंब मी संपवला होता.

“वाः” मी राजकुमाराला म्हणालो. “तुझ्या ह्या सगळ्या आठवणी किती छान आहेत रे. पण अजून माझं विमान मात्र दुरुस्त करू शकलेलो नाही. आणि आता तर आपल्याकडे पिण्यासाठी पाणीदेखील शिल्लक नाही. तेव्हा मलासुद्धा तुझ्या त्या स्वच्छ पाण्याच्या झऱ्याकडे जायला आवडेल.”

“माझा दोस्त... तो कोल्हा...”

“आता त्या कोल्ह्याचा काय संबंध आहे इथे?”

“का नाही?”

“कारण मी आता लवकरच तहानेनं व्याकूल होऊन मरून जाणार आहे.”

त्याला काही माझा तर्क पटलेला दिसला नाही. तो मला म्हणाला, “मित्राचा लाभ होणं हे फार भाग्याचं असतं बाबा. अगदी मरण जवळ आलेलं असलं तरीही... उदाहरणार्थ, कोल्ह्यासारखा मित्र मला लाभला याचा मला अतोनाद आनंद होतो आहे.”

‘आपल्यावर कोणता प्रसंग ओढवलाय ह्याची याला मुळीसुद्धा जाणीव झालेली दिसत नाहीय.’ मी मनातल्या मनात म्हणत होतो. ‘ह्याला ना कधी तहान लागते, ना कधी भूकं. फक्त थोडासा सूर्यप्रकाश मिळाला की यांच काम भागलं!’

माझ्याकडे शांत नजरेनं पाहात त्यानं माझ्या मनात चालू असलेल्या विचारंनाच जणू सहजपणे उत्तर दिलं. “मलादेखील तहान लागलीय...चल आपण एखादी विहीर शोधू या.”

मी खूप थकून गेल्यासारखं त्याला दाखवल, कारण अनमानधपक्यानं त्या एवढया अफाट पसरलेल्या वाळवंटात विहीर शोधयला निघणं म्हणजे केवल खुळेपणा आहे असं मला वाटत होतं. पण तरीही शेवटी आम्ही चालायला सुरुवात केली.

निःशब्दपणे कित्येक तास चालत राहिल्यावर हळूहळू अंधार पसरला. आकाशात तारे चमचम करायला लागलं. तहानेमुळे मला तर ताप आल्यासारखंच वाटत होतं. जणू स्वप्रात असल्यासारखा मी त्या ताऱ्यांकडे पाहात होतो. राजकुमारानं निघताना उच्चारलेले शब्द माझ्या स्मरणात पुन्हा भिरभिरले...

"...म्हणजे तुलादेखील तहान लागलीय?"

पण त्यानं उत्तर दिलं नाही. तो फक्त म्हणाला, "पाण्यानं हृदयाचीही तहान भागत असावी."

त्याला काय म्हणायचं आहे ते मला काहीच कळलं नाहीं. तरीही मी गप्प राहिलो. या अशा वेळेला त्याला पुन्हा काही विचारणंही अशक्यच होतं.

अगदी थकून गेला होता तो. शेवटी तो खाली बसला. मीही त्याच्या शेजारी बसलो.

जरा वेळ नुसताच शांततेत गेला. मग तो म्हणाला, "हे तारे किती सुंदर दिताहेत!"

"नक्कीच! मी म्हटलं. जास्त काही बोलावंसं वाटतच नव्हतं. समोर, चांदण्यात, वाळूचे थरच्या थर अनेक बांध घातल्यासारखे पसरले होते. माझी नजर त्याही पलिकडे पाहण्याचा प्रयत्न करीत होती."

"वाळवंट सुंदर असतं." तो म्हणाला.

खरंच होतं त्याचं म्हणणं. मला वाळवंटं नेहमीच आवडलेली आहेत. आपण वाळूच्या ढिगावर बसलेलं असावं, आपल्याला काहीही दुसरं दिसत नाहीये... काही ऐकू येत नाहीये... आणि तरीही त्या नीरव शांततेतून काहीतरी स्पंदन पावत असावं.. काहीतरी चमकून जावं...

"वाळवंटं सुंदर का असतात?...कारण वाळवंटातच कुठेतरी विहीर लपलेली असते."

राजकुमार असं म्हणाला आणि त्या क्षणी मला त्या चमचमणाऱ्या वाळूचं रहस्य उलगडलं...मी लहान असताना, आम्ही एका जुन्या वाडयात रहात असू. त्या वाडयाबद्दल एक कथा सांगितली जायची की त्यात एक गुप्त खजिना आहे. अर्थातच तो शोधून काढण्यात कुणाला यश आलेलं नव्हतं. पण वाडयात गुप्त खजिना आहे या बातमीमुळेच त्या वाडयाबद्दल एक अद्भुत आकर्षण निर्माण झालेलं होतं. त्या जुन्यापुराझया वाडयात कुठेतरी खोलवर असं काहीतरी रहस्य दडलेलं होतं ."खरं आहे हं..." मी त्याला म्हटलं, "आपल्या नजरेला न दिसणारं असं काही असतं ना, त्यामुळेच तर एखाद जुनंपुराणं घर...तारे...नाहीतर वाळवंट हे सारंच सुंदर होऊन गेलेलं असतं!"

"बघ...किती छान! माझा कोल्हा जे म्हणाचया ते तुलाही पटलं तर!"

आता तो पेंगुळला होता म्हणून मी त्याला उचलून घेतलं आणि पुन्हा चालायला लागलो! माझं मन त्याच्या बद्दलच्या प्रेमानं अगदी भरून आलं होतं आणि मी नुसता थरारून गेलो होता! एखादा अतिशय नाजुक... आणि खूप खूप मौल्यवान असा खजिनाच माझ्या हातात आहे असंच काहीतरी मला वाटत होतं. आणि शिवाय असंही वाटत होतं की... ह्यापेक्षा नाजूक आणि मौल्यवान या पृथ्वीवर दुसरं काही असूच शकणार नाही!

चांदण्यात ती त्याच्याकडे निरखून पाहिलं. ते फिकट कपाळ, त्या मिटलेल्या पापण्या, वऱ्यावर हेलावणाऱ्या त्या सोनेरी बटा. मी स्वतःशी म्हणत होतो, "मला दिसतंय ते याचं फक्त बाह्य शरीर. खरी महत्वाची गोष्ट डोळ्यांना न दिसणारीच असते. त्याच्या त्या किंचित विलगलेल्या ओठांतून अर्धस्फुट हास्य उमलत होतं." गोष्ट पुन्हा-पुन्हा मी स्वतःशी म्हणत होतो, "झोपी गेलेल्या ह्या राजकुमारकडे पाहताना माझ्या भावना उचंबळून येताहेत याचं कारण... हा त्याच्या फुलराणीवर खरंखुरं प्रेम करतो! प्रामाणिक आहे तो आपल्या प्रेमाशी! झोपेतदेखील त्याच्या हृदयात...त्याच्या हृदयात त्या गुलाबराणीची प्रतिमा अखंड तेवत असते... एखाद्या दीपज्योतीसारखी!" आणि आता

तर तो मला आणखीनच नाजूक वाटायला लागला... असं वाटलं... की याला फारफार जपायला हवंय... जणू काही तो स्वतःच वाऱ्याच्या हलक्या फुंकरीसरशी विझून जाईल अशी ज्योत झाला होता...


आणि असाच मी किती काळ चालत राहिलो... आणि क्षितिजावर पहाट फुटत असताना मला ती विहीर दिसली!

## २५

"ही माणसं..." राजकुमार मला म्हणत होता, "स्वतःला जलद धावणाऱ्या बाडमांमधे कोंबून घेतात आणि तरीही कुठे जायचं हे त्यांना ठाऊकच नसतं. मग नुसतीच गडबडगडबड करतात... आणि मग नुसतीच गोलगोल फिरत बसतात." जरा वेळानं तो पुढे म्हणाला, "आणि खरं तर असं करण्याची काहीसुद्धा जरूर नसते."

सहारा वाळवंटातल्या विहिरी म्हणजे वाळूचे नुसते खळगे! प्ण आम्हाला दिसलेली विहिर तशी वाळवंटातली मुळीच दिसत नव्हती. ती एखाद्या खेडयात असते तशीच छान विहिर दिसत होती. पण आसपास कुठे खेडंबिडं असेल असे वाटण्यासारखं काहीसुद्धा दिसत नव्हतं. मला तर असंच वाटलं की आपण नक्की स्वप्नच पाहात आहोत!

"काय आश्चर्य आहे!" मी राजकुमाराला म्हटलं, "इथे तर आपल्यासाठी सगळं काही तयारच आहे. ही बादली, हा दोर..."



तो हसला. त्यानं दोर हातात घेतला आणि पाणी काढण्यासाठी चाकावरून दोर सरसर विहिरीत सोडला. त्या गंजलेल्या चाकाचा कुईकुई असा आवाज आला.

"तू ऐकतो आहेस नं? आपण विहिरला जागं केलं आणि आता ती गाणं म्हणतं आहे!"

पाणी काढण्यासाठी त्यानं दमून जावं हे मला मुळीच बरं वाटेना. म्हणून मी त्याला म्हटलं, "तू थांब, मी काढतो पाणी. बादली ओढायला तुला जड जाईल."

मी बादली हळूहळू वर ओढून घेत विहिरीच्या काठावर टेकवली. मीही किती दमून गेलो होतो; पण पाण्यानं भरलेली बादली वर आल्याबरोबर मला विलक्षण आनंद झाला. अजून त्या फिरणाऱ्या चाकाचं कुईकुई गाणं माझ्या कानात घुमत होतं, आणि समोर... समोर बादलीत हेलावणाऱ्या त्या

पाण्यावर चक्क सूर्यकिरण नाचताना दिसत होते!

तो खरोखरीच कशाच्या शोधात होता ते आता माझ्या लक्षात आलं.

मी त्याच्यां ओठांपर्यनत बादली नेली. चिमुकल्या हातांची ओंजळ करून, डोळे मिटूनच तो पाणी पीत होता. मला तर तो एक आनंदोत्सवच वाटला. दुसऱ्या कोणत्याही सामान्य उत्साहवर्धक पेयापेक्षा हे पाणी वेगळं होतंच. ती ताऱ्यांच्या साक्षीनं रात्रभर केलेली वाटचाल, विहिरीवरच्या चाकाचं ते मंजूळ गाणं, पाणी वर काढण्यासाठी माझी झालेली दमणूक... या सगळ्यामुळे ते पाणी अगदी मधूर होऊन गेलेलं होतं. छानशी भेटवस्तू मिळाली की मनाला जसा आल्हाद वाटतो, तसा त्या पाण्यामुळे आल्हाद वाटत होता. मी लहान होतो ना, त्यावेळेस ते ख्रिसमसच्या झाडावर टांगलेले दिवे...मध्यरात्री सगळ्यांनी मिळून म्हटलेल्या त्या प्रार्थनांमधलं संगीत... सगळ्यांच्या हसऱ्या चेहऱ्यांवरचे कोमल भाव... या सर्वांची चमक मला त्या मिळालेल्या भेटवस्तूंवर चढलेली दिसायची.

“तू तिथे राहतोस ना, तिथली माणसं म्हणजे...” राजकुमार मला म्हणत होता, “पाच हजार गुलाब एकाच बागेत लावतात आणि मग...त्यांना जे हवं असतं ते तिथे त्यांना सापडतच नाही!”

“हवं असतं ते नाहीच सापडत कधी.” मी उत्तरलो.

“आणि ते एवढा ज्याचा शोध करीत भटकत असतात ते फक्त एखाद्या गुलाबपुष्पात.. किंवा ओंजळभर पाण्यातही मिळू शकतं!”

“नक्कीच.” मी म्हटलं.

“पण डोळे आंधळे असताना ना! आपण खरं तर आपल्या मनानंच शोध घ्यायला हवा.”

आता मी पाणी पिऊन तृप्त झालो होतो. जरा सुखानं श्वास घेत होतो. सकाळच्या त्या सुंदर प्रहरात वाळूवर जणू मधाचा रंग चढला होता आणि त्या रंगामुळं कसे अगदी प्रसन्न वाटत होतं. आणि तरीही...तरीही त्याचवेळी... माझ्या मनाला... असं उदासउदासही का बरं वाटत होतं?

“ए, मला दिलेलं वचन तू पाळलं पाहिजेस हं!” राजकुमार हळुवारपणे मला म्हणत होता. तो अगदी माझ्याजवळ येऊन बसला होता.

“कुठलं रे वचन?” मी विचारलं.

“तुला माहिताय्... माझ्या मेंढीच्या तोंडावर बांधायला ती जाळी...? अरे माझ्या त्या फुलराणीची जबाबदारी माझ्यावर आहे ना!”

माझ्या खिशातून मी माझी ती चित्रं बाहेर काढली. ती पाहून राजकुमार हसतच सुटला आणि म्हणाला, “तुझे हे बाओबाब अगदीच पानकोबीचे गड्डे दिसताहेत रे...!”

“खरंच?” आणि मला तर मी काढलेल्या चित्रांबद्दल केवढा अभिमान वाटत होता!

“आणि हा तुझा कोल्हा! त्याचे कान तर बघ शिंगांसारखेच दिसताहेत... आणि केवढे लांबदेखील आहेत ते!!” आणि तो पुन्हा हसला.

“मित्रा, हे शुद्ध अन्याय आहे हं.” मी म्हटलं. “मी तुला आधीच सांगितलं होतं की मला फक्त बोआ अजगरचीच आतून आणि बाहेरून...एवढीच चित्रं काढता येतात म्हणून.”

“जाऊ देरे ते! किनई मुलांना बरोब्बर समजतात ती चित्रं.”

“हं! मग ठीक आहे.”

नंतर मग गुरांच्या तोंडावर बांधायच्या जाळीचं चित्र रेखाटून त्याच्या हाती देत मी त्याला विचारलं :

“तू असे काही बेत केले आहेस ना, जे तू मलासुद्धा सांगितले नाहीस?”

त्यानं काही उत्तर दिलं नाही. उलट तो म्हणाला :

“तुला माहितीय्? उद्या मी पृथ्वीवर आल्याला एक वर्ष पूर्ण होणार...”

नंतर जरा वेळानं तो पुन्हा म्हणाला, “या इथून... अगदी जवळच उतरलो होतो मी.” असं म्हणून तो जरा लाजला. आणि पुन्हा एकदा, का कोण जाणे, माझ्या मनात ती विचित्र हुरहुर जाणवू लागली. मनात एकदम एक शंका उद्भवली, “म्हणजे, आठ दिवसांपूर्वी, त्या सकाळी, वस्तीपासून दूर, तू मला भेटलास, तेव्हा तू काही असाच सहज... कुठेतरी... भटकत नव्हतास तर! तू उतरलास त्याच जागेकडे परत जायला निघाला होतास!”

यावर तो पुन्हा लाजून गेला. जरा बिचकतच मी त्याला पुन्हा विचारलं, “आणि उद्या त्याला वर्ष पुरं होतंय म्हणूनच बहुधा...?”

पुन्हा तो नुसताच लाजला. विचारलेल्या प्रश्नाची उत्तरं तो कधीच द्यायचा नाही. पण एखादं माणूस जेव्हा लाजतं...तेव्हा त्याचा अर्थ ‘होय’ असाच असतो, नाही का?

“अरे पण...! मला जरा भीतीच वाटतेय की...”

पण त्यानं काही माझं वाक्य पुरं करू दिलं नाही. मधेच म्हणाला, “आता तुला लगेच कामाला लागलं पाहिजे. तुला तुझ्या विमानाकडे ताबडतोब परतायला हवं. उद्या संध्याकाळी मी तुझी वाट पाहीन. इथेच ये हं...” माझा त्याच्या बोलण्यावर विश्वास बसत नव्हता आणि राहून राहून त्या कोल्ह्याची आठवण येत होती... आपण कुणाला आपलं मानलं असेल तर कधीतरी आपल्यावर रडण्याचा प्रसंग येतोच.

## 26

त्या विहिरीच्या मागे, जवळच, एक जुनी, दगडी पडझड झालेली अशी भिंत होती. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी काम संपवून मी तिथे पोचत होती तेव्हा दुरूनच मला राजकुमार त्या उंच भिंतीवर पाय हलवीत बसलेला दिसला. मला त्याचा आवाज ऐकू आला. तो कुणाशी तरी काही तरी बोलत होता. म्हणत होता, “म्हणजे, तुला आठवत नाहीये? ही काही तीच जागा नाहीये.”

त्या दुसऱ्याा कुणीतरी नक्कीच त्याला उत्तर दिलं असलं पाहिजे. कारण तो पुढे म्हणाला, “होय होय. दिवस आजचाच होता, पण जागा ही नव्हती...”

मी त्या भिंतीच्या दिशेनं पुढे चालत राहिलो. मला...मला तर कुणी दिसतही नव्हतं की कुणाचा आवाजही ऐकू येत नव्हता. तरीही राजकुमार पुढे बोलतच होता : “अगदी नक्की. तुला वाळूत माझ्या पावलांचे ठसे दिसतील. तू फक्त माझी वाट पहा. आज रात्री... मी तिथेच असेन.”

आता मी भिंतीपासून जेमतेम वीस मीटर अंतरावर होतो आणि अजूनही मला तिथे कुणीही दिसत नव्हतं.

राजकुमार आता म्हणत होता, “तुझं विष चांगलं जहाल आहे नं? मला फार वेळ यातना सोसाव्या लागणार नाहीत ह्याची तुला खात्री आहे नं?”

आणि मी भीतीनं जागच्या जागी थिजून गेलो. जणू मी माझं काळीजच हरवून बसलो होतो. कसलाकसलाही उलगडा होत नव्हता मला.

“तू जा आता. मला खाली उतरायचंय.” राजकुमार म्हणाला.

माझी नजर भिंतीच्या पायथ्याशी पोचली आणि मी दचकून उडीच मारली. तो तिथे होता.. पिवळा जर्द विषारी साप... दंश केल्यापासून फक्त अर्ध्या मिनिटात तुम्हाला स्वर्गात पोहोचवून देऊ शकणारा...


मी खिशातून रिव्हॉल्वर काढताकाढताच एक पाऊल माग घेतलं आणि तेवढ्या त्या माझ्या चाहुलीनं तो सुळ्कन तिथून सटकला... वाळवंटात पाण्याचा झरा जिरून जावा, तसा पलिकडच्या दगडांमधे

तो दिसेनासा झाला . . . जातानाचा किंचित खस्‌खस्‌ असा आवाज आला फक्त .

“ही काय भानगड आहे ?” मी त्याला विचारलं . “तू त्या सापाशी कशाला बोलत होतास ?”

भिंतीजवळ किती नेमक्या क्षणी पोचलो मी ! मी तिथे पोचला आणि भिंतीवरुन खाली येणाऱ्या माझ्या छोट्या मित्राला मी माझ्या हातात अलगद झेलून घेतलं . त्याचा चेहरा बर्फासारखा पांढराफटक पडला होता .

मी त्याच्या चेहऱ्यावर, कानांवर पाणी शिंपडलं, थोडंसं पाणी त्याला प्यायला लावलं . पण त्याला आणखी काही विचारण्याचं धैर्य मात्र मला होईना . त्यानं शांत नजरेनं माझ्याकडे पाहिलं आणि माझ्या मानेभोवती आपल्या चिमुकल्या हातांचा विळखा घातला . शिकाऱ्याची गोळी मर्मी बसलेल्या पक्ष्याच्या काळजाची शेवटची धडधड ऐकू येत असावी . . . तशी त्याच्या हृदयाची धडधड मला जाणवली .



तो मला म्हणाला, “बरं झालं, तुझ्या मशीनमधे काय बिघाड झाला होता तो तुला कळला . आता तुला घरी परतता येईल .”

“पण हे तुला कसं कळलं ?” मी विचारलं . खरं म्हणजे मीच त्याला आता सांगणार होतो की माझ्या दुरुस्तीच्या कामात मला कल्पनेपेक्षा अधिक यश आलं होतं म्हणून .

त्यानं माझ्या प्रश्नाचं काहीही उत्तर दिलं नाही . मला तो म्हणाला, “मीही आज माझ्या घरी परतणार आहे .” किंचित थांबून खिन्न स्वरात तो म्हणाला, “ते फार दूर आहे . . फार अवघडच आहे एकूण . . . ”

काहीतरी विपरीत घडणार आहे हे मला स्पष्टपणे कळून चुकलं . मी त्याला छोट्या बाळासारखं माझ्या छातीशी घट्ट धरून ठेवलं . . . आणि त्याचवेळी मला असं वाटलं . . तो पाताळापर्यन्त जाऊन पोचलेल्या एखाद्या खोलखोल पोकळीत प्रचंड वेगानं खेचला जात आहे आणि काय वाट्टेल ते केलं तरी त्याला थोपवणं आता माझ्या हाती नाही . . .

तो उदास होऊन गेला होता, कुठेतरी शून्यात हरवून जावं तसा .

“माझ्याजवळ तुझी मेंढी आहे, तिची पेटीही आहे, शिवाय जाळी आहे . . .” असं म्हणून तो उदासवाणंहसला . मी कितीतरी वेळ काहीच केलं नाही . हळूहळू त्याला बरंच काही आठवत असल्याचं मला कळत होतं .

“माझ्या छोटुल्या मित्रा, तू फार भ्यायला आहेस . . .” मी म्हटलं .

नक्कीच तो घाबरलेला होता, त्यानं फक्त जरासं हसल्यासारखं केलं .

“संध्याकाळी तर मला आणखी खूपच भीती वाटणार आहे.”

पुन्हा एकदा मला थिजून गेल्यासारखं वाटलं ... काहीतरी...पुन्हा कधीही भरुन न येणारं असं काहीतरी ... मोलाचं, हरवून जात आहे असं वाटत राहिलं. भीतीनं हातापायांतील त्राण नाहीसं झालं. हे निर्भर हसणं मी पुन्हा ऐकू शकणार नाही, हा विचारसुद्धा माझ्या सहन करण्यापलिकडचा होता. त्याचं ते हसणं...वाळवंटात झुळूझुळू वाहणारा स्वच्छ पाण्याचा झराच होता तो माझ्यासाठी.

“दोस्ता, जरासं हास रे तू... मला तुझं हसणं पुन्हा ऐकायचंय.”

माझ्याकडे लक्ष ने देता तो म्हणाला :

“आज रात्री वर्ष पूर्ण होईल. वर्षापूर्वी मी जिथे उतरलो, त्याच जागेच्या बरोब्बर माथ्यावर, माझा तारा मला दिलेल...”

“सांग ना रे मला, माझ्या राजा...” मी पुन्हा म्हटलं, “सांग ना की तो साप, ती त्याला भेटायची जागा आणि तो तारा...सगळं सगळं केवल एक दुःस्वप्न आहे म्हणून!”

माझ्या विनवणीकडे त्यानं लक्ष दिलं नाही. उलट म्हणाला :

“जी खरी महत्वाची गोष्ट असत ती आपल्या या डोळ्यांना दिसत नसते.”

“खरंय...” मी म्हटलं.

“ते फुलराणीवरच्या माझ्या प्रेमासारखंच आहे ... आपण जर एखाद्या ताऱ्यावरच्या फुलावर प्रेम करत असू... तर रात्री आकाशाकडे पाहात राहणं किती सुखाचं वाटतं!... सगळे तारे म्हणजे जणू त्या फुलांची बहार असेत!!”

“खरं आहे रे.”

“तू मला पाजलेलं ते पाणी...तो दोर आणि ते गंजलेलं चाक, तू मला मधुर संगीतच दिलंस जसं!... आठवतं नं? किती छान होतं ते सारं...”

“होय तर!”

“आणि बरं का, रात्री तू ताऱ्यांकडे पहात जा. माझ्या ताऱ्यावरचं सगळंच काही इतकं छोटंछोटं आहे की माझा तारा नेमका कोणता ते मी इथून तुला दाखवू शकणार नाही. एकापरीनं तेही चांगलंच आहे म्हणा. कारण त्यामुळे मग माझा तारा म्हणजे इतर अनेक ताऱ्यासारखाच तुला वाटत राहील ... आणि मग सगळ्याच ताऱ्याकडे पाहात रहाणं तुला आवडायला लागेल. ते सगळे तुझे होऊन जातील आणि शिवाय मी तुला एक भेट देणार आहे...” असं म्हणून तो पुन्हा हसला.

“अरे माझ्या प्रियप्रिय दोस्ता, तुझं हे हसणं मला किती किती आवडतं रे..” मी उदगारलो.

“हीच तर माझी भेट आहे तुला! अगदी तश्शीच...जेव्हा आपण ते पाणी प्यायलो होतो नं, तेव्हाच्यासारखी!”

“तुला नक्की काय म्हणायचंय?”

“हे बघ, तशी सगळी माणसं ताऱ्याकडे पाहू शकतात. पण ताऱ्यांकडे पाहण्याची प्रत्येकाची दृष्टि वेगळी असते. प्रवास करणाऱ्यांना तारे मार्गदर्शक वाटतात. तर इतर काही जणांसाठी तारे म्हणजे फक्त लुकलुकणारे चिमुकले दिवे असतात. विद्वानांना तर तारे म्हणजे कूट प्रश्नच वाटत आले आहेत. आणि माझ्या त्यां व्यापाऱ्याला... तारे म्हणजे त्याचीच संपत्ती! आणि तुझ्याजवळही असूच शकणार नाहीत.”

“म्हणजे तू नेमकं काय म्हणतो आहेस?”

“अरे त्यातल्या एका ताऱ्यावर जर मी राहात असेन, तर दुसऱ्या ताऱ्यातूनही मीच हसत असेन आणि मग तू जेव्हा रात्री आभाळाकडे पाहशील तेव्हा सगळेच तारे तुझ्याकडे पाहून हसताहेतसं तुला वाटेल तुझ्यासाठी, तुझ्यासाठी फक्त... आभाळात एवढे हसरे तारे असतील!”

तो पुन्हा हसला.

“आणि जेव्हा तुझं दुःख जरा शांत झालेलं असेल, कारण काळ हा सगळ्याच दुःखांना शांत करीत असतो अरे – आणि तेव्हा तुला मोठं समाधान वाटेल की तुझी माझ्याशी ओळख झाली होती. तू नेहमीच माझा मित्र राहणार आहेस. तुला माझ्याबरोबर हसावंसं वाटणार. आणि कधीकधी बरं का, तू तुझी खिडकी उघडशील नं, माझ्याकडे पाहून हसण्यासाठी, तर तुझ्या मित्रांना मात्र वाटेल की अरेच्च्या, हा असा आभाळाकडे पाहून हसत काय बसला आहे? मग तू त्यांना सांगशील, ‘होय, मला ताऱ्याकडे पाहून नेहमीच हसावंसं वाटतं!’ असं म्हणालास की, त्यांना तू म्हणजे अगदी विक्षिप्तच वाटशील.. म्हणजे मी ही अशी तुझी भलतीच थट्टा उडवेलेली असेल...होय की नाही?”

आणि तो पुन्हा हसला.

“बरं का, जशा काही ताऱ्यांऐवजी या मी तुला खूप खूप घंटाच दिलेल्या आहेत. कसं हसायचं असतं हे माहीत असणाऱ्या घंटा...” आणि पुन्हा हसला तो. नंतर एकदम गंभीर झाला आणि म्हणाला :

“आज रात्री... माहीतच आहे तुला... तू यायचं नाहीस.”

“मी तुला एकट्याला मुळीच सोडणार नाहीये.” मी म्हणालो.

“अरे, मला यातना होत असल्यासारखा मी दिसेन. कदाचित् मी मरून जातो आहे असंही वाटेल. ते पाहायला तू येऊ नकोस. जिवाला त्रास करून घ्यावा असं त्यात काही नाहीये.”

“मी तुला सोडून जाणार नाही.”

“तुला मी हे मुद्दाम सांगतोय...” काळजीच्या स्वरात तो म्हणाला, “ते त्या सापामुळेसुद्धा बरं का. त्यानं तुला चावता कामा नये. हे साप म्हणजे फार वाईट असतात; निव्वळ गंमत म्हणून ही ते कुणाला चावू शकतात...”

“पण मी तुला सोडणार नाही.”

तेवढ्यात बरं वाटण्यासारखा एक विचार त्याचा मनात आला.

“हेही खरंच की दुसऱ्यांदा दंश करण्याइतकं विष सर्पाजवळ नसतंच.” तो म्हणाला.

त्या रात्री, तो तिथून निघून जाताना मी प्रत्यक्ष पाहिला नाही. अगदी हलकेच, जराही आवाज न करता तो माझ्यापासून दूर झाला होता. जेव्हा मी त्याला गाठू शकलो तेव्हा तो आपलं पाऊल जलद आणि निश्चयपूर्वक उचलत होता. तो एवढंच म्हणाला :

“अरेच्या! आलासच तू शेवटी!”

नंतर माझा हात त्यानं आपल्या हातात घेतला. अजूनही तो माझीच काळजी करीत होता, म्हणाला, “इथं येण्यात चुकलंच आहे तुझं. तुला फार क्लेश होतील बघताना. मला बघून मी मेलोय असं तुला वाटेल. पण ते खरं असणार नाहीये.”

मी काहीच बोललो नाहीं.

“तुला माहित आहे की ते... फार दूर आहे. तिथे मला हे शरीराचं ओझं नेता येणार नाही. फार जड असतं ना ते.”

मी स्तब्ध होतो.

तो थोडासा खचल्यासारखा झाला, पण पुन्हा एकदा त्यानं सांगण्याचा प्रयत्न केला.

“ते किती सुंदर असेल हे माहीत आहे तुला. मीसुद्धा ताऱ्याकडे पाहात जाईन.. सगळे तारे त्या चाक बसवलेल्या विहिरीसारखे असतील, आणि मग सर्व तारे माझ्या ओंजळीत पिण्यासाठी स्वच्छ, ताज्या, पाण्याची धार धरतील; इतकं मजेदार असेल ते सारं! तुझ्याजवळ पाचशे कोटी छोट्याछोट्या

घंटा वाजत असतील, आणि माझ्याकडे पाचशे कोटी स्वच्छ ताज्या पाण्याचे झरे असतील...”

त्यानंतर तो काही बोलला नाही. त्याच्या डोळ्यात आता पाणी होतं.

“हे बघ आलंच ते ठिकाण. चल आता मला एकट्यालाच जाऊ दे.” आणि तो खालीच बसला. घाबरून गेला होता. मग म्हणाला :

“माहितीय तुला? माझी फुलराणी...माझ्यावरच आहे तिची जबाबदारी... आणि ती तर अशी नाजूक, किती अजाण आहे ती! ह्या एवढ्या मोठ्या जगापासून स्वतःला वाचवंण्यासाठी तिच्याजवळ फक्त चार काटे आहेत...फक्त चार निरुप्योगी काटे!”

मीही आता खाली बसलो, कारण माझ्याच्यानं आता जराही चालवत नव्हतं.

“तर आता...बस् संपलंच...”

तो जरासा घुटमळला, मग उठून उभा राहिला...एक पाऊल पुढे टाकलं.

दुसरं काहीच नव्हतं त्या जागी, फक्त पायाच्या घोट्याशी काहीतरी पिवळं चकाकलं. क्षणभर तो नुसता स्तब्ध राहिला...जरादेखील ओरडला नाही...आणि एखादं झाड हलकेच जमिनीवर आडवं होत जावं तसा तो खाली कोसिळला. पायतळी असलेल्या बाळूमुळे काही आवाजही झाला नाही.

आणि आता या गोष्टीला सहा वर्ष उलटून गेली आहेत. आजपर्यंत ही गोष्ट मी कुणालाही सांगितलेली नाही. मला जिवंत, सुखरूप परतलेलं पाहून माझ्या साथीदारांना अतिशय आनंद झाला. मी खिन्न असायचो, पण ‘मी फार थकून गेलो आहे’ एवढंच त्यांना सांगायचो. आता जरासा सावरलोय तोसुद्धा म्हणण्यापुरताच. अजून पूर्ण शांत झालो नाही. छोटा राजकुमार मात्र आपल्या ग्रहावर परतलाय हे मला पक्कं ठाऊक आहे. कारण त्या रात्रीनंतरच्या पहाटे मला त्याचं मृत शरीर कुठेही दिसलं नाही. तसं काही ते शरीर जड वगैरे नव्हतं. आणि रोज रात्री मी ताऱ्यांचं संगीत ऐकत असतो, कोट्यावधी किणकिणणाऱ्या चिमुकल्या घंटा...

शिवाय आणखी एक भलतीच गोष्ट झाली आहे. राजकुमारासाठी मेंढीच्या तोंडावर बांधायला ती जाळी मी काढली होती नं? तिला बांधायला चामडयाचा बंद असतो तो काढायलाच मी विसरलो होतो! त्यामुळे त्याला ती मेंढीच्या तोंडावर कधीच बांधता येणार नाही. म्हणून मग मला आश्चर्य वाटत असतं, कसं काय चाललं असेल बरं त्याच्या तया ग्रहावर...? मेंढीनं... फुलराणीला खाऊन तर टाकलं नसेल ना...?

एकदा मी स्वतःशी म्हणतो : “नक्कीच नसेल. माझा राजकुमार फुलराणीला प्रत्येक रात्री काचेच्या घुमटाखाली ठेवतो, आणि मेंढीवरदेखील त्याचं नीट लक्ष असतं.” मग मला बरं वाटतं आणि सगळे तारे गोडसं हसत रहातात.

मग लगेच पुन्हा मनात येतं, ‘कधी काली, एखाद्याच क्षणी, आपलं लक्ष नीटसं नसतंही.. आणि बस्...तेवढंच पुरतं. कदाचित एखाद्या संध्याकाळी, छोटा राजकुमार फुलराणीला काचेच्या घुमटात ठेवायला विसरला... किंवा एखाद्या रात्री, मेंढी जराही आवाज न करता निसटली... तर...’ आणि मग किणकिणणाऱ्या घंटा झालेल्या त्या साऱ्या चांदण्या डोळ्यांतले अश्रू होऊन जातात.

हे एक मोठं रहस्यच आहे, माझ्या राजकुमारावर माझ्यासारखंच प्रेम करणाऱ्या तुमच्यासाठी आणि माझ्यासाठी : जर कुठेतरी, नेमकं कुठे ते नसू दे माहीत... पण, आपण न बघितलेल्या त्या मेंढीनं...हो की नाही?...जर गुलाबपुष्पाला खाऊन टाकलं असेल तर... तर या विश्वास शाश्वत असं काहीच असणार नाहीये...

वर, वर आकाशात पहा आणि स्वतःलाच विचारा, की याचं उत्तर...‘हो’... की ‘नाही’? मेंढीनं फूल खाऊन टाकलंय? आणि मग कळेलच तुम्हाला की या ‘हो’ किंवा ‘नाही’ मुळेच प्रत्येक गोष्ट केवढी बदलून जात असते...

...मात्र या गोष्टीचं महत्व, वयानं वाढलेल्या कोणत्याही माणसाला आजवर उमजू शकलेलं नाही!

हे चित्र माझ्यासाठी सर्व जगात, सगळ्यात सुंदर, आणि सगळ्यात उदासवाण असं आहे. नव्वदाव्या पानावरही असंच चित्र आहे, पण तुमच्या स्मरणात पक्कं ठसावं यासाठी मी ते पुन्हा काढलं आहे. हीच ती जागा, जिथे इटुकल्या राजकुमारानं पृथ्वीवर पहिलं पाऊल टाकलं होतं, आणि इथूनच तो दिसेनासा झाला.

कधीकाळी जर तुम्ही आफ्रिकेतल्या वाळवंटात प्रवास केलात, आणि या जागी आलात.. तर... तर चटकन ओळख पटावी म्हणून ही जागा अगदी नीट लक्षपूर्वक पाहून ठेवा. तुम्हाला हात जोडून विनवतो की जर कधी इथं आलात तर घाईघाईनं निघून जाऊ नका! आणि जर कुणी प्रश्नांची उत्तरं न देणारा, सोनेरी केसांचा छोटासा मुलगा नुसता हसत राहिला, तर तुम्ही ओळखालच तो कोण आहे ते. जर असं झालं ना तर तुम्ही खरंच माझं सांत्वन करू शकाल...कृपा करून मला लगेच पत्र लिहा आणि कळवा की,... तो परत आला आहे.

## आन्तुआन द संतेक्झयुपेरी

(जन्म 1900; मृत्यू 1943)

फ्रान्समधील लिओ हे आन्तुआन द संतेक्झयुपेरी यांचं जन्मगाव. व्यवसाय विमानचालक. 1927 च्या सुमारास विमानं अगदी प्राथमिक अवस्थेत होती. हवाई मार्ग निश्चित ठरलेले नव्हते. वैमानिकाला अनेक आपत्तींना तोंड द्यावं लागे. अनेकदा विमानात बिघाड होई, अपघातही होत.

वैमानिक व्यवसाय, वृत्तलेखन आणि इतरही अनेक कारणांमुळे त्यांना जगाच्या कानाकोपऱ्यातून प्रवास करण्याची संधी मिळाली.

दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या आरंभी त्यांनी महत्वाची कामगिरी बजावली. आणि अशाच एका उड्डाणाच्या वेळी, 1943 मधे त्यांचं विमान बेपत्ता झालं. मानवी जीवनावर महायुद्धामुळे होणारे सम्यक् परिणाम पाहून ते अस्वस्थ्य होत आणि त्यातूनच त्यांना लेखनाची प्रेरणा मिळत असावी. त्यांच्या लेखनात, त्यांनी घेतलेल्या विविध अनुभवांचं चित्रण जसं साकारतं, तसंच जीवनविषयीचं गाढ चिंतनही प्रकट होतं. असीम आकाशात भ्रमण करणाऱ्या त्या काळच्या वैमानिकाला जाणवणारं एकलेपण, सतत भेडसावणारं मृत्युभय, त्याला साहसांबद्दल वाटणारं आकर्षण, आकाशातून प□थ्वीकडे पाहात असताना तिच्याबद्दलची वाटणारी ओढ व कौतुक, मानवी संस्कृतिबद्दलचा अभिमान कशा कितीतरी गोष्टींचे पडसाद त्यांच्या लेखनात उमटलेले दिसून येतात.

मानवी संस्कृतीची जडणघडण ही अत्यंत प्रयासानं झालेली आहे. आणि म्हणून तिची जपणूक करणं हे प्रत्येक व्यक्तीचं बहुमोल कर्तव्य आहे, असं त्यांना वाटतं. यंत्र आणि माणूस ह्यांच्यातील परस्पर-संबंधांचं वर्णनही ते आत्मीयतेनं करतात. फ्रेंच साहित्यात त्यांचं असं वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. विशेषतः 'द लिटिल प्रिन्स' या त्यांच्या कादंबरिकेची विसाव्या शतकातील अक्षर-वाङ्मयात गणना केली जाते.